cmyk

## संपादकीय

### ऐतिहासिक निर्णय!

शिक्षणासंदर्भात राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात आला आहे. या संदर्भात नेमलेल्या समितीने सीबीएसई अभ्यासक्रम राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना लागू करण्यास मान्यता दिल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळात दिली. येत्या शैक्षणिक वर्षापासूनच म्हणजे २०२५-२६ या वर्षामध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात सीबीएसई शाळांमध्ये शिक्षणाचा बाजार मांडला आहे. काही शाळा विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे शुल्क घेत असतात.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### दिल्ली विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात

नवी दिल्ली: दिल्ली विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारी सुरू होईल. नवनिर्वाचित दिल्ली सरकारचा पहिला अर्थसंकल्प मंगळवारी (२५ मार्च) सादर केला जाईल. दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंदर गुप्ता म्हणाले की, राष्ट्रीय राजधानीतील जुन्या सचिवालयातील विधानसभा सभागृहात अधिवेशन सुरू होईल. विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता माध्यमांशी बोलताना म्हणाले की, उद्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला दिवस आहे. कॅगचा अहवालही अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडला जाईल. हे अधिवेशन तात्पुरते २४ मार्च ते २८ मार्च २०२५ या कालावधीत चालणार आहे, आवश्यक असल्यास या कालावधीत मुदतवाढ केली जाऊ शकते.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३२९ | सोमवार, दि.२४ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# मराठवाड्यावर पाणी संकटाचे सावट

## आठ प्रकल्प कोरडे; शेतकरी पुन्हा अडचणीत येणार

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील एकूण ७५१ लघु प्रकल्पांपैकी आठ प्रकल्प कोरडे पडले आहेत. दुसरीकडे ७२ लघु व ३ मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे. पाणीसाठा जोत्याखाली गेलेल्या तीन मध्यम प्रकल्पात धाराशिवमधील दोन व जालन्यातील एका प्रकल्पाचा समावेश आहे. कोरड्या पडलेल्या लघु प्रकल्पात हिंगोलीतील ३, बीड, लातूर, धाराशिवमधील प्रत्येकी एक व जालन्यातील २ लघु प्रकल्पांचा समावेश आहे. पाणी साठा कमी झाल्याचा सर्वाधीक फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. पाण्याचे स्थानीक स्रोत आटत असतानाच प्रकल्पही आटू लागल्याने मराठवाड्यातील शेतकरी पुन्हा अडचणीत येणार आहे.**



जोत्याखाली पाणीसाठा गेलेल्या ७२ लघु प्रकल्पात धाराशिवमधील सर्वाधिक २३, बीड मधील १६, जालन्यातील १३, नांदेड मधील ९, हिंगोलीतील ५, परभणीतील ४ व लातूर मधील २ लघु प्रकल्पांचा समावेश आहे. २११ लघु प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी, २४५ प्रकल्पात २५ ते ५० टक्के ,१४८ प्रकल्प ५० ते ७५ टक्के तर केवळ ६७ लघु प्रकल्पात तर टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा शिल्लक आहे. ७५ टक्के पेक्षा जास्त पाणीसाठा असलेल्या लघु प्रकल्पांची संख्या छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक ५५ आहे. त्यापाठोपाठ धाराशिवमधील ६, लातूरमधील दोन तर जालना, बीड, नांदेड, परभणी या जिल्ह्यातील प्रत्येकी एका लघु प्रकल्पात ७५% पेक्षा जास्त उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. पान २ वर


### उपयुक्त पाणीसाठा ४८ टक्क्यांवर

मराठवाड्यातील ८७९ मोठ्या, मध्यम, लघु प्रकल्पांसह गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील बंधाऱ्यांमधील उपयुक्त पाणीसाठा ४८.७७ टक्क्यांवर आला आहे. यामध्ये ७५ माध्यम प्रकल्पांमध्ये असलेल्या ४४ टक्के उपयुक्त पाणीसाठयासह ७५१ लघु प्रकल्पातील केवळ ३२ टक्के उपयुक्त पाणी साठ्याचा समावेश आहे.

### २२ लघु प्रकल्पात केवळ २ टक्के उपयुक्त पाणी

परभणी जिल्ह्यातील २२ लघु प्रकल्पात केवळ दोन टक्के उपलब्ध पाणी साठा शिल्लक आहे. हिंगोली जिल्ह्यातील २७ लघु प्रकल्पात १९ टक्के, नांदेड मधील ८० प्रकल्पात ३५ टक्के ,धाराशिव मधील २०६ प्रकल्पात ३४ टक्के, लातूर मधील १३५ प्रकल्पात ४३ टक्के,बीड मधील १२६ प्रकल्पात २७ टक्के,जालन्यातील ५७ प्रकल्प २८ टक्के तर छत्रपती संभाजीनगर मधील ९८ लघु प्रकल्प २५ टक्केच उपयुक्त पाणी शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

# दंगलग्रस्त भागातील संचारबंदी उठविली!



**नागपूर । प्रतिनिधी**

**राज्याच्या उपराजधानीत गेल्या आठवडाभर दंगलग्रस्त भागात असलेली संचारबंदी अखेर रविवारी दुपारी तीन वाजता उठविण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी घेतलेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना टप्प्याटप्प्याने संचारबंदी पूर्णतः उठविण्यात येईल असे संकेत दिले होते.**

रविवारी पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी या विषयीचे आदेश जारी केले. यानुसार नागपुरातील झोन क्रमांक ३ मधील गणेश पेठ, कोतवाली, तहसील आणि झोन क्रमांक ५ मधील यशोधरा नगर या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील संचारबंदी पूर्णतः उठविण्यात आली आहे. नागपूरकरांना पान २ वर

# पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडवरुन हटवा


## संभाजीराजे छत्रपतींचे मुख्यमंत्र्यांना पत्र,३१ मे पर्यंत समाधी हटविण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत असलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी हटवावी, अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र लिहित मागणी केली आहे.**

वाघ्या कुत्र्याचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख नाही. तसेच, ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नाही. त्यामुळे ३१ मे २०२५ पूर्वी ही समाधी हटवावी, असे छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रात म्हटले





आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात छत्रपती संभाजीराजेंनी म्हटले आहे की, हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही. भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली असल्याचे संभाजीराजेंनी म्हटले आहे. त्यांनी पुढे लिहिले की, समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती पान २ वर

### “एकदा पुतळा हटवला होता मात्र पुन्हा बसविण्यात आला

रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीच्या मागे कथित वाघ्या कुत्र्याची समाधी बांधण्यात आली आहे. या गोष्टीला कोणताही ऐतिहासिक आधार नसल्याचे सांगत शिवभक्तांनी त्याला अनेकदा विरोध केला आहे. या आधी एकदा शिवप्रेमींनी तो पुतळा हटवला होता. पण प्रशासनाने तो पुन्हा त्या ठिकाणी बसवला. त्या पुतळ्याला पोलिसांचे संरक्षणदेखील आहे. आता संभाजीराजेंनीही पुन्हा एकदा वाघ्या कुत्र्याचा पुतळा हटवण्याची मागणी केली आहे. वाघ्या कुत्र्याची समाधी ही अलिकडच्या काळात बांधण्यात आली असून, ते रायगडवरील अतिक्रमण असल्याचे संभाजीराजेंनी म्हटले आहे.

# अल्पसंख्यांकांचे धार्मिक अधिकार कायमचे काढून घेण्याचा प्रयत्न

## वक्फ दुरुस्ती विधेयकावरून काँग्रेसचा सरकारवर आरोप

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**काँग्रेसने रविवारी वक्फ दुरुस्ती विधेयकावर एक निवेदन जारी केले आणि म्हटले की हा पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचा संविधानावर ''आणखी एक हल्ला'' असल्याचा आरोप केला. २७ फेब्रुवारी रोजी, केंद्रीय मंत्रिमंडळाने संसदेच्या संयुक्त समितीने प्रस्तावित केलेल्या सर्व १४ बदलांसह सुधारित वक्फ विधेयकाला मंजुरी दिली.**




काँग्रेस खासदार आणि संपर्क प्रभारी जयराम रमेश यांनी रविवारी एका निवेदनात म्हटले आहे की, हे विधेयक भाजपाच्या रणनीतीचा आणि आपल्या अद्वितीय बहुधार्मिक समाजातील शतकानुशतके जुन्या सामाजिक सौहार्दाच्या बंधनांना नुकसान पोहोचवण्याच्या सततच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. हे विधेयक खोटा प्रचार पसरवून आणि पूर्वग्रह निर्माण करून अल्पसंख्याक समुदायांना राक्षसी बनवण्याचा आणि धर्माचा विचार न करता सर्व नागरिकांना समान हक्क आणि संरक्षणाची हमी देणाऱ्या घटनात्मक तरतुदींना कमकुवत प्रयत्न आहे. जयराम रमेश यांनी निवडणुकीच्या फायद्यासाठी पान २ वर

# विधानसभेत सगळे खोके भाईच भरले आहेत - राज ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

**एक खोक्याभाई काय घेऊन बसलात, सगळी विधानसभाच भरली आहे अशा शब्दांत राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय स्थितीवर भाष्य केले आहे. विधानसभेत सगळे खोके भाईच भरले आहेत, असा टोला ठाकरे यांनी लगावला. मुंबईत पार पडलेल्या मनसेच्या पदाधिकारी बैठकीमध्ये त्यांनी हे वक्तव्य केले आहे.**



महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून भाजप पदाधिकारी आणि आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. सतीश भोसलेला शिरुरमधील ढाकणे कुटुंबाला मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली असून त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. सतीश भोसलेवरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी एक मोठे विधान केले आहे. पार पडलेल्या बैठकीत राज ठाकरे यांनी संघटनेत मोठे फेरबदल केले. मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी संदीप देशपांडे यांच्यावर देण्यात आली आहे. मुंबईतील विभाग अध्यक्षांच्या कामावर देखरेख ठेवून त्यांच्यात समन्वय राखण्याची जबाबदारी मुंबई अध्यक्षावर असणार आहे. याशिवाय मनसे नेते बाळा नांदगावकर यांच्यावर गट अध्यक्षांच्या कामाचा आणि राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यावर मनसे शाखा अध्यक्षांच्या कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. नितीन सरदेसाई विभाग अध्यक्षांच्या कामाचा आढावा घेतील.

# पत्नीची हत्या; वेल्हाळा शिवारातून पती फरार

## सदरील दाम्पत्य परळी तालुक्यातील रहिवाशी

**भुसावळ । प्रतिनिधी**

**तालुक्यातील वेल्हाळा शिवारात दारूच्या नशेत पतीने पत्नीची गळा आवळून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना २३ मार्चरोजी पहाटे समोर आली असून संशयित आरोपी पती अजीज सलीम शेख (वय ३३) रा. परळी हा घटनास्थळावरून पसार झाला आहे.**

वेल्हाळा शिवारातील गट क्र. ६५१ मध्ये किशोर पाटील (रा. सुसरी) यांच्या मालकीच्या विटभट्टीवर परळी वैजनाथ येथील नियाजउद्दीन शेख मन्सूर हे कुटुंबासह कामासाठी आले होते. त्यांच्यासोबत मुलगी सना आणि जावई अजीज सलीम शेख हे चार मुलांसह विटा तयार करण्याचे काम करीत होते. सर्व कुटुंब एकाच परिसरातील पत्र्याच्या खोल्यांमध्ये राहत होते.(केसीएन)अजीज सलीम शेख याला दारूचे व्यसन असल्याने तो रोज रात्री पत्नीशी भांडण करीत असे. शनिवारी रात्रीही दारूच्या नशेत तो घरी आल्यावर पत्नी सना (वय २५) हिला शिवीगाळ करू लागला. शेजारी असलेल्या सासूने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. जेवणाचा आग्रह केल्यानंतर अजीज व सना आपल्या मुलांसह खोलीत झोपायला गेले. रविवारी पहाटे कामासाठी उठवायला गेल्यानंतर खोलीतून प्रतिसाद मिळाला नाही. दरवाजा उघडताच सासू आणि इतर मजुरांनी पाहिले तेव्हा सना ही रक्तबंबाळ अवस्थेत मृत पडल्याचे आढळले.(केसीएन) तिच्या डोळ्या आणि नाकातून रक्त येत होते तसेच गळ्यावर व्रण असल्याने गळा आवळल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सना शेख हिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत अद्याप स्पष्टता नाही. मात्र, गळा दाबल्याचा संशय असल्याने शवविच्छेदन अहवालानंतर हत्या कशी घडली याचा उलगडा होईल, असे पोलिसांनी सांगितले.ङ्कङ्कघटनेनंतर पती अजीज शेख फरार झाला असून त्याच्यावरच पत्नीच्या हत्येचा संशय पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ मार्च २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८८.०० क्विंटल | २,००० | ३,१९१ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड: १३१.०० क्विंटल | १,७०० | ३,९४० | २,४४६ |
| मका/लोकल:२४.०० क्विंटल | २,१९३ | २,१९३ | २,१९३ |
| तूर : ७.५० क्विंटल | ६,८२१ | ६,९४१ | ६,८८१ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७५.०० क्विंटल | २,००१ | ३,०५१ | २,६३९ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ३८.०० क्विंटल | ३,९५० | ४,००० | ३,९७५ |
| हरभरा: ५४.०० क्विंटल | ५,०७१ | ५,२६० | ५,१६२ |

# पाणी फाऊंडेशन महाराष्ट्रात पुन्हा सक्रिय होणार

## आमिर खानची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

**आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत. पुढच्या वर्षीपासून आम्ही पूर्ण महाराष्ट्रात हे काम करू, अशी घोषणा अभिनेता आमिर खानने केली आहे. काही मोजक्या गावांमध्ये नाही तर आता राज्यभरातील अनेक गावांमध्ये पाणी फाऊंडेशनचे तुफान पुन्हा येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला.**





३ वर्षांपूर्वी एक स्वप्न घेऊन आम्ही पुढे आलो होतो. ते स्वप्न शेतकऱ्यांसाठी होते. शेतकऱ्यांसाठी काय करू शकतो, पीक कसे वाढवता येईल हे सगळे मुद्दे घेऊन समोर आलो होतो. देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो की ते आमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले म्हणून दरवर्षी आम्ही यशस्वी होत गेलो. असेही ते आमिर खानने म्हटले. देवेंद्रजी प्रत्येक वर्षी तुम्ही मला एक गोष्ट विचारता की हे काम घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात तुम्ही कधी जाणार आहात? पण आम्हाला थोडी भीती वाटते कारण ही जिम्मेदारी खूप मोठी आहे आपला महाराष्ट्र जर्मनी पेक्षा खूप मोठा आहे म्हणून भीती वाटते की राज्यभर आपण पाणी फाउंडेशनच काम घेऊन जाऊ शकतो का? आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत. पाणी फाउंडेशनचे काम आता संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याचे अभिनेता आमिर खान यावेळी म्हणाले.

### मराठवाड्यात कामे झाली, आता राज्यभर होणार

आमीर खानने त्याच्या सत्यमेव जयते मार्फत दुष्काळाचे आव्हान पेलण्याचे ठरवले. काही वर्षांपूर्वी पाणी फाउंडेशनची स्थापना केली गेली. सत्यमेव जयतेच्या वैशिष्ट्याप्रमाणे दुष्काळी भागात फिरून उपलब्ध जलसाठे, पावसाचे प्रमाण इत्यादी आवश्यक माहिती गोळा केली गेली. त्यानंतर दुष्काळाला हरवण्याचा प्लान बनवण्यात आला. महाराष्ट्रातील विशेषत: मराठवाड्यातील काही गावांमध्ये पानी फाऊंडेशनचे काम झाले. आता महाराष्ट्रभर पाणी फाऊंडेशन काम करणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

cmyk

## अग्रलेख

# ऐतिहासिक निर्णय!

शिक्षणासंदर्भात राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात आला आहे. या संदर्भात नेमलेल्या समितीने सीबीएसई अभ्यासक्रम राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना लागू करण्यास मान्यता दिल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधिमंडळात दिली. येत्या शैक्षणिक वर्षापासूनच म्हणजे २०२५–२६ या वर्षामध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात सीबीएसई शाळांमध्ये शिक्षणाचा बाजार मांडला आहे. काही शाळा विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे शुल्क घेत असतात. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थी सीबीएसई प्रणालीचे शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यामुळे राज्य शासनाने महाराष्ट्र शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये सीबीएसई शिक्षण सुरू करण्यासंदर्भात सुकाणू समिती नेमली होती.

या समितीने राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबतच्या आराखड्याला मान्यता दिली आहे. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके मराठीतून उपलब्ध करून दिली जाणार आहेत. १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार आहे. परिपूर्ण समाज घडविण्यासाठी राज्यातील प्रत्येक शाळेमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येणार आहे. दरम्यान इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणेही बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यातील शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यापैकी एक म्हणजे राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करणे. राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर राज्य सरकारने भर दिला आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर राज्यात सीबीएसई पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा घेण्यात आला. काही जणांनी सीबीएसईच्या सुसंगत अभ्यासक्रमाला नव्हे तर शैक्षणिक संस्कृतीला विरोध केला आहे. हा बदल झाला तर दहावी–बारावीचे कॅलेंडर देखील बदलावे लागेल असे त्यांचे म्हणणे आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत असा अभ्यासक्रम २०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात तयार करण्यात आला आहे. या आराखड्याची आणि एनईपीची अंमलबजावणी येत्या तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. कोणताही अभ्यासक्रम लागू करायचा झाल्यास तो इयत्ता पहिलीपासून करावा लागतो. त्यानुसार या वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांना राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. या अभ्यासक्रमाची आखणी सीबीएसईच्या धर्तीवर करण्यात आली आहे. राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाकडून पहिलीची पुस्तके 'एनईपी'च्या धर्तीवर छपाई सुरू करण्यात आली आहे म्हणे. सीबीएसईच्या अभ्यासक्रमानुसार राज्यातील शाळा १ एप्रिलपासून सुरू करण्यास शिक्षण क्षेत्रातून विरोध केला जात आहे

कारण सीबीएसईप्रमाणे राज्याचे वेळापत्रक करणे चुकीचे ठरणार आहे. शालेय कामकाज हे १५ मार्चला सुरू होऊन एप्रिलअखेर संपते. सीबीएसईच्या शाळा प्रामुख्याने महानगरात असून त्या शाळांची संख्या मर्यादित आहे. मात्र राज्य मंडळाच्या रचनेनुसार एप्रिलअखेर शालेय कामकाज संपते. एप्रिल ते जूनमध्ये यात्रा, जत्रांचा कालावधी असतो. विदर्भ, मराठवाड्यात कडक उन्हामुळे तिथे शैक्षणिक वर्ष दहा दिवस उशिरा सुरू होते. भौगोलिक परिस्थितीचा विचार करून शैक्षणिक वर्ष तयार करण्यात आले आहे. नवीन बदल करायचे म्हटले तर दिवाळीची सुटी तशीच ठेवून दिवाळीपूर्वी ७० टक्के आणि नंतर ३० टक्के अभ्यासक्रम संपवावा लागेल. शैक्षणिक वर्ष अस्थिर झाल्याने मूल्यमापन पद्धतीत त्रुटी राहू शकतात. सीबीएसईच्या सुसंगत अभ्यासक्रमाला विरोध नसून शैक्षणिक संस्कृतीला विरोध केला जात आहे हे लक्षात घ्यायला हवे. शिक्षणमंत्री भुसे यांनी म्हटले आहे की, यंदा पहिल्या टप्प्यात केवळ इयत्ता पहिलीसाठी हा पॅटर्न लागू होईल. पुढील वर्षी दोन टप्प्यांत दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांना हा पॅटर्न लागू करण्यात येईल.

विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम सहज आत्मसात करता यावा यासाठी टप्प्याटप्प्याने बदल केले जात आहेत. सर्व वर्गांचा अभ्यासक्रम एकदम बदलला तर विद्यार्थ्यांना जुळवून घेणे कठीण जाईल म्हणून संथगतीने पण ठोस पावले टाकली जात आहेत. सीबीएसई पॅटर्नमध्ये ३० टक्के स्थानिक सवलतीचा लाभ घेत महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल आणि मराठी भाषेला प्राधान्य देण्यात येणार आहे. पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध होतील आणि राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी हा विषय बंधनकारक राहील. सीबीएसई लागू झाल्याने शाळांची फी वाढणार नाही. पालकांवर कोणताही अतिरिक्त बोजा पडणार नाही. सीबीएसई पॅटर्न लागू केल्याने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील शिक्षणाशी जुळवून घेण्यास मदत होईल तसेच स्पर्धात्मक परीक्षा (जी, नीट, यूपीएससी) आणि उच्च शिक्षणासाठी चांगली तयारी करता येईल. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. नवा अभ्यासक्रम लागू होणार असल्याने शाळा कधी सुरू होणार याबाबत विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम होता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून सुरू होणार असल्याचे सांगितले जात होते. परंतु आता त्याबाबतचा संभ्रम दूर झाला असून १५ जूनपासूनच शाळा सुरू होतील असे सांगण्यात आले आहे.

# पैसे घेऊन पक्केघर असणाऱ्या व्यक्तींना घरकुलचा लाभ

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी पंचायत समिती अंतर्गत बोरगाव येथे पक्के घर असणाऱ्या व्यक्तींना घरकुलाचा लाभ देण्यात आला असून त्याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. विविध घरकुल योजनेतून गरीब लोकांना लाभ न देता पैशाची देवाण घेवान करुन पक्के घर असणाऱ्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला तसेच पहिला घरकुलाचा लाभ घेऊन परत दुसराही लाभ घेत अशी तक्रार करण्यात आली. तसेच दूसराही घरकुलाचा लाभ देण्यात आला अशी तक्रार लक्ष्मण केरुबा थोरात, रा. बोरगांव खुर्द, यांनी घनसावंगी पंचायत समिती गट वकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली. तालुक्यातील मौजे बोरगांव खुर्द येथील ग्राम पंचायतचे सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमत करून गावामध्ये विविध घरकुल योजने मधून गरीब लोकांना लाभ न देता पैशाची देवान घेवान करुन ज्या लाभार्थ्यांचे घर पक्के असतांना देखील मोठ मोठ्या धनवान लोकांना घरकुलाचा लाभ दिला आहे. तसेच या अगोदर देखील घरकुलाचा लाभ घेतलेला असतांना दुबार लोकांना पैसे घेऊन घरकुलाचा लाभ दिला आहे. तसेच ज्या लोकांच्या नावे ८–अ नसतांना देखील त्यांना लाभ दिला आहे. तसेच एकाच कुटूंबात राशन कार्डमध्ये घरकुलाचा लाभ घेतलेला असतांना त्याच राशन कार्डमधील दुसऱ्या व्यक्तीचे नाव दाखवून घरकुलाचा लाभ दिला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. तक्रार अर्जाचा गांभीर्याने विचार करुन संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी लक्ष्मण कोरब थोरात यांनी केली आहे. नसता लोकशाही मार्गाने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हिंगोली तालुक्याची बैठक

## शिवाजी देशमुख सभागृहात राष्ट्रवादीचा पक्षप्रवेश सोहळा व पदनियुक्तीचा कार्यक्रम

हिंगोली। प्रतिनिधी

शहरातील शिवाजी देशमुख सभागृह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची तालुका कार्यकारिणीची बैठक हिंगोली तालुकाध्यक्ष रवी डोरले यांच्या नेतृत्वात शनिवारी २२ मार्च रोजी दुपारी दोन वाजता पार पडली या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी दादा बांगर दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठानकर प्रकाशराव थोरात विश्वनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची तयारी कशी करावी व हिंगोली तालुक्यातील सर्वच गावामध्ये गाव तिथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शाखा व घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तयार करण्यासाठी सूचना दिल्या व पक्षाची सुरू असलेली सदस्य नोंदणी गाव वस्ती



तांड्यापर्यंत कार्यकर्त्यांनी करावी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन मजबूत करून पक्षाची ताकद वाढवावी व सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत कशा पोहोचतील त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे असे सांगितले यावेळी हिंगोली तालुक्याची कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली यामध्ये राष्ट्रवादीचे हिंगोली तालुका उपाध्यक्षपदी दत्तराव नवघरे, प्रकाश दिपके कैलास डांगे केशव कोरडे गणेश दहातरे तर राष्ट्रवादी हिंगोली तालुका सचिव पदी गणेश डोलारे हिंगोली तालुका संघटक पदी रमेश कामखेडे हिंगोली तालुका सहसंघटक पदी प्रकाश भाकरे तालुका सहसचिव गणेश जाधव तालुका कोषाध्यक्षपदी बळीराम घोंगडे तालुका कार्यकारणी सदस्य पदी माधव गायवळ एकनाथ लोथे माधव सोमोसे या सर्वांचे निवड करून त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व पक्ष संघटना वाढी संदर्भात जोमाने काम करण्याचे आदेश तालुका कार्यकारणीला देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे युवक प्रदेश सचिव सुजय देशमुख सेनगाव तालुकाध्यक्ष विकास शिंदे, हिंगोली शहराध्यक्ष केशव दुबे ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विकी देशमुख विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष तेजस पवार दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेषराव कावरखे सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष बबलू सय्यद माजी पंचायत समिती सदस्य दूल्हे खान पठाण युवक शहराध्यक्ष हिंगोली स्वप्निल इंगळे युवा नेते सुरज वडकुते सांस्कृतिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सागर चौधरी महेश थोरात शेख हनीफ विशाल काळे सचिन मस्के चक्रधर जगताप जुनेद शेख सुभाष झाडे यांच्यासह राष्ट्रवादीचे सर्व आघाड्याचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कठुआमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक

कठुआ । वृतसंस्था

**जम्मू–काश्मीरमधील कठुआ येथे रविवार दि. २३ मार्च रोजी संध्याकाळी उशिरा सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना सर्व बाजूंनी घेरले आहे.**

कठुआमधील हिरा नगरमधील सान्यालमध्ये पाच दहशतवादी दिसल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली. दहशतवाद्यांची माहिती स्थानिकांनी सैन्याला दिली. पाच दहशतवादी लपल्याची माहिती दिली. शोध मोहिमेदरम्यान दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला. सैनिकांनी गोळीबार करून प्रत्युत्तर दिले. सुरक्षा दलांनी सान्याल गावाजवळ शोध मोहीम सुरू केली. सुरक्षा दलांची संयुक्त टीम दहशतवाद्यांच्या जवळ पोहोचताच त्यांनी गोळीबार सुरू केला. या भागात अतिरिक्त सुरक्षा दल पाठवण्यात आले आहे. अधूनमधून गोळीबार सुरूच आहे.

# आपल्या मुलांना सूसंस्कृत व उद्याचा सुजान नागरीक बनवण्यासाठी जि.प.शाळा बाहेगव्हाण येथे प्रवेश घ्या; शालेय व्यवस्थापन समितीचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता पहिलीचे वर्ग सन २०२५-२६ साठी १ एप्रिल पासून सुरू होत आहेत. आपल्या मुलांना सुसंस्कृत व उद्याचा सुजाण नागरिक बनवण्यासाठी जिल्हा परिषद शाळा बाहेगव्हाण येथे आजच प्रवेश निश्चित करा असे शालेय समिती व्यवस्थापन यांनी कळविले आहे**

. या शाळेमध्ये बालवाडी पासूनच मुलावर सुसंस्कार केले जातात याबरोबरच मुलांमध्ये बालपणापासून विकसनशील बुद्धी



विकसित व्हावी यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रम राबवले जातात या उपक्रमामध्ये शाळेतील सर्व शिक्षक ,शिक्षिका स्वतः सहभाग घेऊन मुलाशी समरस होतात व त्यांना प्रशिक्षण देतात. बालपणापासूनच मुलांना शिस्तीचे धडे दिले जातात. याबरोबरच मोफत गणवेश, पोषण पूरक आहार, वार्षिक स्नेहसंमेलन, निसर्ग सहल, परिसरभेट ,अध्ययन ,स्मार्ट एलईडीचा, वापर प्रश्नमंजुषा, दप्तर विना शाळा , भाषण, रांगोळी, चित्रकला, निबंध व क्रीडा आणि स्पर्धा परीक्षां आधीवर मार्गदर्शन करतात. शाळेमध्ये विविध खेळ तसेच विविध प्रकारच्या वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक यामध्ये कंदील ,हस्तकला ,यादेखील शिकवल्या जातात मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी छोट्या छोट्या नाटिका बसवणे गीत गायन करणे समूहगीत गायन करणे असे उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी जिल्हा परिषद शाळा तत्पर आहे मुलांचे भवितव्य व त्यांचे भविष्य याचा विचार करून सर्व पालकांनी आपल्या पाल्यांचा पहिली मध्ये प्रवेश निश्चित करावा असे आवाहन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केले आहे.

# आभाळापलीकडील क्षितिजाचा शोधयात्री–गोविंद शेळके

**अग्रनामांकित वृत्तवाहिनीचे बीड जिल्हा प्रतिनिधी गोविंद शेळके यांची ''जरा विसावु या वळणावर'' ही पोस्ट अनेक न्युजप्रेमींसह प्रेक्षकांच्या जिव्हारी लागलेली दिसुन येते. प्रतिष्ठा, सन्मान, ओळख, प्रतिमा मिळवुन देणारा एबीपी माझासोबतचा गोविंदचा दिड दशकांचा प्रवास तुर्तास थांबतोय, याचे शल्य सर्वदुर आढळत आहे. पत्रकारितेमधील बहुरंगी, बहुअंगी व बहुविध रुपे समोर येत असताना त्यावर भाष्य करण्याचे प्रयोजन नाहीच. विधायक, निकोप, विश्वासार्ह, रोखठोक, सरळ, परखड, स्वच्छ, सडेतोड, निर्मळ आणि सर्वोपयोगी पत्रकारिता करणाऱ्या गोविंदने एबीपी सोडण्याचा निर्णय ''अचानक'' घेतला नाही, हे निश्चित आहे. सर्वदुर ऋणानुबंधाचे समृध्द नेटवर्क असणाऱ्या गोविंदच्या पत्रकारितेचा राजकारणी, समाजकारणी, प्रेक्षक, सन्मित्र, साहित्यिक, शिक्षणप्रेमींसह सर्व स्तरातील पत्रकारांनासुध्दा सार्थ अभिमान वाटत होता. समाजसेवी अभिनेता सोनु सुद यांच्या,**

की ज़िंदगी में एक वक्त आता है...<br>
की उसे तय करना होता है...<br>
पन्ना पलटना है...<br>
या क़िताब बंद करनी है...

या ओळींनी प्रभावीत झालेल्या गोविंदच्या मनात ''तेच ते साचेबंद होतेय, कुठे तरी थांबायला हवं'' हे द्वंद गतकाळापासुन सुरु होते. सोमेश्वरनगरीचा सोमेश्वरपुत्र गोविंद रंगनाथ शेळके हा आमचा विद्यार्थीमित्र. समाजकारणासह राजकारणातील मार्मिक, दुर्मिळ व आतल्या गोटातील रंजक माहिती ऐकण्याची नामी संधी मिळते, नवोपक्रम राबवण्याच्या अभिनव संकल्पना समोर येतात आणि सार्वजनिक व वैयक्तिक कामे मार्गी लागतात यासह अनेक कारणास्तव गोविंदची आणि आमची बैठक. शालेय जिवनात वक्तृत्वावर प्रभुत्व असणाऱ्या गोविंदने लातूर आणि छ.संभाजीनगर येथुन पत्रकारितेमधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्याचा झुंजारनेता, मी मराठी व ईटीव्हीपासुन सुरु झालेला प्रवास एबीपी माझात स्थिरावला होता. एबीपीच्या



मंचावरुन राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बातम्यांसोबत गोदा परिक्रमा, कोरोनातील जग, कृषीविषयक सातबाराच्या बातम्या, आषाढी वारी, दुष्काळाचे वार्तांकन, विशेष बाईटस्? व मुलाखती, साहित्य संमेलने, बीडचा दुर्मिळ वारसा यासह अनेक जिव्हाळ्याचे विषय ऐरणीवर आणले आहेत, याचे आपण साक्षीदार आहोत. एबीपी माझावरील समयोचित, लालित्यपुर्ण, काव्यमय, क्रमबध्द, ओघवत्या व भावुक भाषेतील गोविंदचे वार्तांकन श्रवणीय असायचे. गोविंद हा ''विवेकी, संतुलित व तटस्थ'' पत्रकारिता करत होता म्हणुनच सर्व राजकर्त्यांशी त्याचे जिव्हाळ्यासह सलोख्याचे संबंध होते, हे सर्वज्ञात आहे. गोविंदचा सुसंवाद, देहबोली, स्मितहास्य, हितगुज व मोजक्या शब्दातील शब्दफेक सर्वप्रिय असल्याने त्याचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटतो. बीडमधला कोणीही अगंतुक महाराष्ट्रात कुठेही गेला तर ''गोविंद शेळके माझे मित्र आहेत,'' हे सांगताना प्रत्येकाची छाती फुगलेली आपण पाहिली आहे किंबहुना टिव्ही पाहताना गोविंद स्क्रिनवर दिसला तर संपुर्ण कुटुंबाला ''आपल्या गोविंदची बातमी किंवा गोविंद टिव्हीवर दिसतोय'' असे अभिमानाने सांगतानासुध्दा आपण अनुभवले आहे. त्यामुळे गोविंद बीडच्या घराघरात, मनामनात व तनातनात आहे. बीडसह महाराष्ट्राचा सर्वक्षेत्रीय अभ्यासक गोविंद अनेक पुरस्कारांचा मानकरी तर ठरलाच आहे, अलिकडे अनेक कार्यक्रमात ''व्याख्याता'' म्हणुन श्रवणीय, संदर्भप्रचुर व व्यासंगी मांडणी करताना दिसत होता. गोविंदसोबत गप्पांची मैफल म्हणजे सुसंगत, वस्तुनिष्ठ, चिकित्सक, तर्कसंगत, मार्मिक व मजेशिर विचारांची पर्वणी असायची, हा अनुभव सार्वत्रिक आहे. वार्तांकनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर भटकंती करताना गोविंदने जन्मभुमीशी नाळ कायम ठेवली हे विशेष आहे. सर्वांसोबत ऋणानुबंध जपताना बाळभाऊ, रविभाऊ, धनुभाऊ व प्रविण यांच्या वर्तुळात राहणाऱ्या गोविंदने शेतीत अनेक यशस्वी प्रयोग केले आहेत तर शिक्षणप्रेमींचे तिर्थक्षेत्र अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील अनेक उपक्रमांच्या नियोजनात त्याचा सिंहाचा वाटा आहे. वादविवाद स्पर्धेची डॉक्युमेन्ट्री, एबीपी माझावरील बातमी, मृदगंध साहित्य संमेलनातील परिसंवादात निमंत्रित आणि नियोजनात सहभाग, माजी विद्यार्थी मेळाव्यातील भावुक मनोगत अशा किती तरी उपक्रमात सहभागी होवुन त्याने कार्यक्रमांची उंची वाढवली आहे. गोविंदची कांही वाक्ये किंवा कांही विचार खुपच मार्मिक, चिंतनीय, प्रभावशाली व सुविचारासारखे असल्याने आम्ही संग्रही करुन ठेवले आहेत. सर्वत्र स्नेह, सौहार्द, जिव्हाळा उर्जा आणि सर्वानंद पेरणारा वलयांकित गोविंद आज वळणावर विसावतोय याचे शल्य असले तरी गोविंद आभाळापलिकडील क्षितीजाचा शोधयात्री असल्याने माध्यमातील प्रवासास पुर्णविराम मिळणार नसुन तो अभिनव, नव्या व कल्पक मंचाच्या माध्यमातुन प्रेक्षकांसमोर येईल, असा दुर्दम्य आशावाद आहे. बीडसह महाराष्ट्रासह बीडचा सृजनशिल व उपक्रमशिल भुमीपुत्र तथा ''फिनिक्स'' गोविंदच्या नव्या भुमिकेसह नव्या इनिंगचे आपण स्वागत करुन त्याला सद्भावनेसह शुभेच्छा देवु या...

# पान १ वरून...

### मराठवाड्यावर पाणी

७५ मध्यम प्रकल्पांपैकी दहा प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी तर २९ प्रकल्पात २५ ते ५० टक्के २२ प्रकल्पांत ५० ते ७५ टक्के टक्केवारी ११ मध्यम प्रकल्पात ७५ टक्क्यापेक्षा जास्त पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामध्ये सर्वाधिक १० मध्यम प्रकल्प छत्रपती संभाजीनगर मधील तर एक प्रकल्प बीडमधील,असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

------------

### पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची

शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे. कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मे २०२५ अखेरीपर्यंत सदरील अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. भारतीय पुरातत्व विभागाच्या धोरणानुसार ४११ वर्षांहून अधिक पुरातन असलेली संरचना संरक्षित स्मारक म्हणून गणली जाते. त्यामुळे वाघ्या कुत्रा समाधी संरचनेस १०० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच विहित कालमर्यादेत ही संरचना हटविणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी पत्रामध्ये म्हटले आहे.

-------------

### दंगलग्रस्त भागातील

हा मोठा दिलासा म्हणता येईल. सोमवारी १७ मार्च रोजी हिंदुत्ववादी संघटनांच्या आंदोलनादरम्यान औरंगजेबाचा प्रतिकात्मक पुतळा, कबर जाळण्यावरून झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर एकंदर ११ पोलीस स्टेशनच्या हद्दीत खबरदारीचा उपाय म्हणून ही संचारबंदी लावण्यात आली होती. सहा दिवसांनी शनिवारी गणेश पेठ, तहसील आणि कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत रात्री सात ते दहा दरम्यान तीन तासांची वाहन चालक तसेच इतरांना सवलत देण्यात आली. मध्यंतरी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठकीत आढावा घेतल्यानंतर कपिल नगर, नंदनवन पोलीस स्टेशन हद्दीत संचारबंदी उठविण्यात आली, तर सहा पोलीस स्टेशन अंतर्गत दुपारी दोन ते चार दरम्यान शिथिलता देण्यात आली. मात्र लागलीच शुक्रवारी मिळालेल्या इनपुटनुसार ती मागे घेण्यात आली व संचारबंदी कायम करण्यात आली. यामुळे एकंदर नऊ पोलीस स्टेशनच्या हद्दीत संचारबंदी कायम होती. आजच्या या निर्णयाने दंगलग्रस्त भागातील नागरिकांना आता मोठा दिलासा मिळाला आहे.

----------

### पत्नीची हत्या; वेल्हाळा

व्यक्त होत आहे. याप्रकरणी मृत सना हिचा भाऊ अजहर नियाजउद्दीन शेख मन्सूर याच्या तक्रारीवरून वरणगाव पोलीस ठाण्यात अजीज सलीम शेख याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच सपोनि जनार्धन खंडेराव, पो.कॉ. सुकराम सावकारे, मनोहर बनसोडे, भुषण माळी, साहेबराव कोळी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सह पोलीस निरीक्षक जनार्धन खंडेराव करत आहेत. पती अजीज शेख याला अटक करण्यासाठी पोलीस पथके शोधमोहिम राबवत आहेत.

-----------

### अल्पसंख्यांकांचे धार्मिक अधिकार

आपल्या समाजाला कायमचे ध्रुवीकरणाच्या स्थितीत ठेवण्यासाठी अल्पसंख्याक समुदायांच्या परंपरा आणि संस्थांना बदनाम करण्याचा, आरोपही यावेळी केला. हे विधेयक ''दोषपूर्ण'' असल्याचा दावा करण्यासाठी पाच कारणे त्यात नमूद केली आहेत. पुढे जयराम रमेश यांनी असेही सांगितले की, ''वक्फचे व्यवस्थापन करण्यासाठी मागील कायद्यांद्वारे तयार केलेल्या सर्व संस्था (राष्ट्रीय परिषद, राज्य मंडळे आणि न्यायाधिकरण) सक्रियपणे त्यांची प्रतिष्ठा, रचना आणि अधिकार कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे जेणेकरून समुदायाला त्यांच्या स्वतःच्या धार्मिक परंपरा आणि व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार जाणूनबुजून हिरावून घेतला जाऊ शकेल,'अशी भीतीही यावेळी व्यक्त केली.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. २४ मार्च २०२५



## राज ठाकरेंनी भाकरी फिरवली

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत खाते न उघडू शकलेल्या राज ठाकरे यांनी आता पुन्हा संघटनात्मक पातळीवर जोर देण्यास सुरुवात केली आहे. मनसेमधील नवीन रचना आणि संघटनात्मक बदल आज जाहीर केले आहेत.मनसेने पहिल्यांदाच मुंबईसाठी अध्यक्षपदाची नेमणूक केली आहे. त्याशिवाय, राज ठाकरे यांचे पुत्र, मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावरही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**

नुकत्याच झालेल्या एका बैठकीत राज ठाकरे यांनी नेत्यांना प्रमुख शहराच्या जबाबदाऱ्या वाटून देणार असल्याचे सांगितले होते. तसेच नाशिक, नवी मुंबई, ठाणे जिल्ह्याच्या धर्तीवर मुंबईसाठीही अध्यक्ष नियुक्त करण्यात येणार आहे. मुंबईतील विभाग अध्यक्षांच्या कामावर देखरेख ठेवून त्यांच्यात समन्वय राखण्याची जबाबदारी मुंबई अध्यक्षावर असणार आहे. मनसेच्या मुंबई शहर अध्यक्षपदी संदीप देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संदीप देशपांडे यांच्यानंतर ३ जिल्हा उपाध्यक्ष असणार आहेत. उपाध्यक्षांनंतर विभाग अध्यक्ष असणार आहेत. मनसेने आतापर्यंत मुंबईसाठी कधीही अध्यक्षांची नेमणूक केली नव्हती. आता मात्र थेट पहिल्यांदाच मुंबई अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली आहे. मनसेने आपल्या पक्ष संघटनेची सगळी रचना बदलली आहे. मनसेचे पहिले मुंबई अध्यक्षपद संदीप देशपांडे यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. तर, केंद्रीय समितीमध्ये विभाग अध्यक्षांची जबाबदारी नितीन सरदेसाई यांच्याकडे आहे. शाखा अध्यक्षांची जबाबदारी ही अमित ठाकरे यांच्याकडे असणार आहे. गटाध्यक्ष केंद्रीय समितीची जबाबदारी ही बाळा नांदगावकर यांच्याकडे असणार आहे.

# कार्यक्षम प्रशासनाच्या माध्यमातून राज्याच्या औद्योगिक आणि शाश्वत विकासाला प्राधान्य -मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक । प्रतिनिधी**

**विकासाची प्रक्रिया केवळ राज्याच्या एका भागापुरती मर्यादित न ठेवता राज्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅपच नव उद्योजकांपुढे मांडला. कॉन्फडेरेशन ऑफ़ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे पश्चिम क्षेत्र परिषदेने आयोजित संवादात नाशिकच्या विकासालाही चालना देण्याचा निर्धारही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.**

सीआयआय यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे पश्चिम क्षेत्र परिषदेच्या तीन दिवसीय बैठकीचा समारोप आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या संवादाने झाला. सीआयआयचे राष्ट्रीय अध्यक्ष तरंग खुराणा आणि न्यूज १८ चे अँकर आनंद नरसिंहन यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्यासह दीपक बिल्डर्सचे दीपक चंदे, यंग इंडियन्सच्या पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष कृणाल शहा, वेदांत राठी, नाशिक शाखेचे संस्थापक अध्यक्ष जनक सारडा, नाशिक शाखेचे अध्यक्ष हर्ष देवधर, पारुल धाडीच, भाविक ठक्कर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सर्वच प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली आणि त्याचबरोबर राज्याच्या विकासाची दिशाही स्पष्ट केली. कार्यक्षम प्रशासन, निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी याद्वारे विकास प्रक्रियेला गती दिली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी कुंभमेळा, त्याअनुषंगाने होणारी विकासकामे याबाबतही त्यांनी नाशिकरांना आश्वस्त केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नाशिकमध्ये औद्योगिक विकासाची मोठी क्षमता आहे. येथील मनुष्यबळ आणि हवामान लक्षात घेता पर्यटन आणि औद्योगिक



विकासाला भरपूर वाव आहे. एचएएलमुळे डिफेन्स इकोसिस्टम इथे आहे. मुंबईचा फायदा पुणे, छत्रपती संभाजीनगर शहरांना झाला. समृद्धी महामार्गामुळे आता नाशिकचा अधिकगतीने विकास होणार आहे. देशातील सर्वात मोठे बंदर आता वाढवण येथे होत आहे. नाशिक येथून वाढवणसाठी ग्रीनफिल्ड रोड तयार करणार असल्याने त्याचा खूप मोठा फायदा नाशिक शहराला मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापरावर भर मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती झाली. दळणवळण सुविधांचा विकास झाल्यास त्याचा लाभ नाशिकला होईल. एआय तंत्रज्ञानाचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने कसा करू शकतो, याकडे अधिक लक्ष दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. गुगल बरोबर भागीदारी करून सेंटर ऑफ एक्सलन्स बाबत काम सुरू केले आहे. कृषी, कायदा क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याने नव्या रोजगार आणि उद्योग संधी निर्माण होत आहेत. तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नवे अभ्यासक्रम विकसित करण्यात येत आहेत. रतन टाटा स्कील युनिव्हर्सिटीने याबाबत दहा हजार महिलांना प्रशिक्षण दिले. ग्रामीण भागातील उद्योजकांना अधिक वाव देण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले. नाशिकमध्ये शेती प्रक्रिया उद्योगाचे उत्तम मॉडेल उद्योगासोबतच कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. नाशिकची ओळख प्रगत शेतीसाठी आहे. जिल्हा द्राक्षे, कांदे, भाजीपाला उत्पादनत आघाडीवर आहेत. कृषी क्षेत्रात मूल्यवर्धित साखळी नाशिकने विकसित केली असून हे नाशिक मॉडेल आहे. याशिवाय, सह्याद्री ॲग्रोने प्रक्रिया उद्योगाचे मॉडेल अतिशय चांगल्या पद्धतीने राबविले आहे. राज्याने स्मार्ट योजना, ॲग्री बिझनेस योजना सुरू केली. बाजारपेठ व्यवस्थेचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा यासाठी काम सुरू केले. केंद्रीय योजना प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून २० लाख घरे उभारण्यात येत आहे. त्याचा लाभ विविध माध्यमातून ग्रामीण भागाला होत असल्याचेही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. भारताची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियनकडे वाटचाल करत आहे, त्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची १ ट्रिलियन अर्थव्यवस्था २०२९ मधेच होईल यासाठी रोडमॅप तयार आहे. आर्थिक विकासासाठी दळणवळणाची गती महत्वाची आहे. पायाभूत सुविधाही महत्वाच्या आहेत. त्यादृष्टीनेच समृद्धी महामार्ग तयार झाला आहे. शक्तिपीठ महामार्गही तयार करत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.


महाराष्ट्रात गुंतवणूकसाठी अनुकूल वातावरण, सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात देशात विकासाच्या बाबतीत स्पर्धात्मक वातावरण आहे. दहा-बारा राज्ये उद्योग आणि आर्थिक विकासात चांगले काम करत आहेत. महाराष्ट्र यात आघाडीवर आहे. कारण येथे गुंतवणुकीसाठी चांगले वातावरण आहे. देशात येणारी सर्वाधिक परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होत आहे. ही गुंतवणूक केवळ महानगर क्षेत्रात नव्हे, तर राज्यात सर्वत्र व्हावी यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत. त्याला यश मिळत आहे. मुंबई, पुण्यासह छत्रपती संभाजीनगर, नागपूर, गडचिरोली सारख्या जिल्ह्यातही गुंतवणूक होत आहे. पहिल्या तीन तिमाही अहवालात औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.महाराष्ट्र मॉडेल ऑफ गव्हर्नन्स आहे. ज्या इतर राज्यात काही चांगल्या कल्पना आहेत, त्याचीही अंमलबजावणी राज्यात करत आहोत. राज्यात शाश्वत विकासाला प्राधान्य देण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्रातील दोन महिला डॉक्टरांचा मध्यप्रदेशात भीषण अपघातात मृत्यू

**शिवपुरी । प्रतिनिधी**

**मध्य प्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यात फोरलेन हायवेवर भीषण अपघात झाला. यामध्ये अर्टिगा कार उलटून कारमधील दोन महिला डॉक्टरांचा मृत्यू झाला आहे. तर अन्य चार डॉक्टर जखमी झाले आहेत.**

हे सर्व डॉक्टर एकाच कारमधून तीर्थयात्रेसाठी निघाले होते. अयोध्येला जाऊन आल्यानंतर ते उज्जैन महाकालेश्वर मंदिराकडे जात होते. यावेळी लुकवासा पोलिस ठाणे क्षेत्रात शिवपुरी-गुना हायवेवर त्यांची कार अनियंत्रित झाली, यामुळे ती उलटून पुलावरून खाली कोसळली. दहा दिवसांपूर्वी हे सर्व डॉक्टर तिर्थयात्रेसाठी



गेले होते. डॉ. अतुल आचार्य हे कार चालवत होते. कवासा बायपासवर त्यांचे कारवरील नियंत्रण सुटले. अपघाताची माहिती मिळताच कोलारस पोलिस ठाण्याची मदत आली आणि जखमींना हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉ. अतुल आचार्य हे भिवंडीचे असल्याचे सांगितले जात आहेत. सकाळी आठ वाजता हा अपघात झाला आहे.

जखमींमध्ये डॉ. उदय जोशी (६४) रा. दादर, डॉ. सुबोध पंडित (६२) रा. वसई, डॉ. अतुल आचार्य (५५) रा. भिवंडी आणि डॉ. सीमा जोशी (५९) यांचा समावेश आहे. तर मृतांमध्ये अतुल आचार्य यांची पत्नी डॉ. तन्वी आचार्य (५०) व सुबोध पंडित यांची पत्नी डॉ. नीलम पंडित (५५) यांचा मृत्यू झाला आहे. नीलम यांना हॉस्पिटलमध्ये नेत असताना मृत्यू झाला तर तन्वी यांचा जागेवरच मृत्यू झाला होता.

## जलसंकट दूर करण्यासाठी सगळ्यांचा सहयोग आवश्यक-राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर

छत्रपतीसंभाजीनगर । प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजना आणि उपाययोजनाद्वारे मराठवाड्यावरील जलसंकट दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नांमध्ये सगळ्यांचा सहयोग आवश्यक आहे, असे आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी आज येथे केले. जागतिक जल दिनानिमित्त शहरात वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. विभागीय क्रीडा संकुल येथून सुरुवात होऊन संत गजानन महाराज मंदिरापर्यंत जाऊन पुन्हा क्रीडा संकुल येथे समारोप करण्यात आला. या वॉकेथॉनला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमास पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, सामाजिक वनिकरण विभागाच्या विभागीय वन अधिकारी कीर्ती जमदाडे, जिल्हा क्रीडा अधिकारी संभाजी देसाई, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, स्टरलाईट चे मिलिंद पाटील, ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपसिंग बयास, जिल्हा समन्वयक किरण बिलोरे यांसह विविध विभागांचे अधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पाण्याच्या जपून वापराबाबत मार्गदर्शन करत जलसंवर्धनासाठी प्रशासनाने हाती घेतलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले की, मराठवाड्याच्या जलसमृद्धीसाठी शासन विविध उपक्रम राबवत असून, त्याला सर्व संस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जलसंकट दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीपसिंग बयास यांनी केले. सूत्रसंचालन मीनाक्षी बालकमल यांनी केले, तर आभार प्रदर्शन किरण बिलोरे यांनी केले.

## ...तर मसाजोगचे प्रकरण घडले नसते -प्राजक्तताई धस

**पाटोदा । प्रतिनिधी**

पत्रकारीता ही नेत्यांची गुलाम झाल्याने पत्रकार हा बातमी मागील बातमी शोधण्याचा प्रयत्न करत नसल्याने अनेकांचे जिवन उध्वस्त होत असून माझ्या विरोधात एका समाजाला हाताशी धरून अॅट्रॉसिटी दाखल करण्यात आली या दरम्यान बीड जिल्ह्यातील कोणत्याही पत्रकारांने खरे प्रकरण शोधण्याचा किंवा मी पत्रकार परिषद घेण्याचा प्रयत्न केला तर जिल्ह्यातील एकही पत्रकार आला नाही.त्यावेळी पत्रकारांनी सत्याच्या शोध घेतला असता तर आज मसाजोगचं प्रकरण घडलंच नसतं महानंदाच्या संचालिका मा.सौ. प्राजक्तताई सुरेश धस यांचे प्रतिपादन

दि.२३ मार्च रविवार रोजी मराठी पत्रकार परिषदेच्या पाटोदा शाखेच्या वतीने भव्य महीला दिनानिमित्त नारी सन्मान सोहळ्याचं आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. प्राजक्तताई सुरेश धस होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात राजकीय गोप्यस्पोट केला की महिला ह्या प्रत्येक घडणाऱ्या घटनाकडे बारकाईने लक्ष देत असते किंवा तिचे हे गुणधर्मच असते.मीही काही घडणाऱ्या घटनाकडे बारकाईने लक्ष देतच असते मला मागे ओटु पावर कंपनीच्या प्रकरणात बनगर यांना काहींनी उचलून नेलं होतं यामध्ये वाल्मिक कराड यांच नाव आले होते.हे मला खटकलं म्हणून आण्णाला सुध्दा म्हणाले होते मात्र त्यांनी दुर्लक्ष केलं यांच दरम्यान मला परळी कनेक्शन दिसून आलं मी त्या प्रकरणात पुढे जाऊ नये म्हणून एका समाजाला हाताशी धरून माझ्या विरोधात अॅट्रॉसिटी दाखल करण्यात आली असून मी परळी पॅटर्नाला मी घाबरले नाही तर कडाडून विरोध केला विधानसभा निवडणुकीनंतर आण्णालाही बाब लक्षात आल्यानंतर संगळ आपल्या समोर आहे.तरी पत्रकारांनी कोणतेही बातमी करताना त्या मागील बातमीचा शोध घ्यावा.असे मत व्यक्त सौ. प्राजक्तताई धस यांनी केले.यावेळी व्यासपीठावर अँड.संगिताताई धसे,नगराध्यक्षा सौ.दिपाली जाधव,ह.भ.प.राधाताई महाराज, नगरसेविका निलावती,वाघमारे,नगरसेविका आरती गोरे,नगरसेविका खतिजाबी सय्यद,नगरसेविका जावळे,आदी मान्यवर उपस्थित होते..

## कोण होणार महाराष्ट्राचा लाडका युवा कीर्तनकार

### आष्टी तालुक्यांतून सचिन महाराज म्हस्के यांची निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

१ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या सोनी मराठी या टीव्ही वरती कोण होणार महाराष्ट्राचा लाडका युवा कीर्तनकार यासाठी आष्टी तालुक्यातून सचिन महाराज मस्के सावरगावकर यांची निवड झालेली आहे.



सचिन महाराज मस्के हे जोग वारकरी शिक्षण संस्था आळंदी येथे शिक्षण घेत आहेत. सचिन महाराज मस्के हे गुरुवर्य श्री ज्ञानेश्वरी कंठभूषण ह भ प कृष्णा महाराज रासने यांच्यामुळे वारकरी संप्रदायात आले आहे. जेव्हा एक गरीब

शेतकऱ्याचा मुलगा जेव्हा कीर्तनासाठी उभा राहतो, आणि तो टीव्ही वरती दिसतो, तेव्हा एका शेतकरी बापाचा उर अभिमानाने भरून येतो. आज जगामध्ये पाहिलं तर नववी दहावीच्या वर्गातील मुले व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत, पण याच वयात सचिन महाराज मस्के सावरगावकर आज कीर्तन करतात हे कोणाच्यातरी आशीर्वादाचीच पुण्याई म्हणावे लागेल. आज माझ्या वयातील मुले, व्यसनाच्या आहारी गेले आहेत. पण मी याच वयामध्ये एवढ्या मोठ्या स्टेज वरती कीर्तन करण्याचा योग आला, यामागे माझे आई-वडील आणि बडे बाबा मच्छिंद्रनाथ यांचा मोठा कृपाशीर्वाद आहे..

-सचिन महाराज मस्के सावरगावकर.

## अंबड येथे राजेंद्र शर्मा यांच्या वतीने इफ्तार पार्टी

### रमजानच्या पवित्र महिन्यात हिंदू मुस्लिम ऐक्याचे आदर्श

अंबड । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा सध्या पवित्र रमजान महिना सुरू आहे. मुस्लिम बांधव पहाटेच्या पहिल्या प्रकाशापासून सूर्यास्तापर्यंत अन्न, पाणी आणि इतर गोष्टी पासून दूर राहतात यालाच उपवास किंवा रोजा म्हणतात. रमजान मध्ये उपवास सुरू होण्यापूर्वी पहाटे शहरी आणि उपास सोडल्यानंतर संध्याकाळी इफ्तार करतात. रमजान म्हणजे धैर्य, संयम आणि अल्लाहाच्या आज्ञेचे पालन करणे होय. या पवित्र रमजानच्या काळात अंबड येथील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व उद्योजक राजेंद्र शर्मा यांनी अंबड येथील अकबरी मस्जिद मध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी मोठ्या संख्येने हिंदू मुस्लिम समाज बांधव



उपस्थित होते. राजेंद्र शर्मा यांचे अनेक मुस्लिम बांधवांशी गेल्या अनेक वर्षापासूनचे अत्यंत जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, जीवाभावाचे नाते आहे. हिंदू मुस्लिम मधील हे मैत्रीपूर्ण नाते आदर्श ठरते. अकबरी मज्जिद मध्ये आयोजित

पार्टी प्रसंगी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून रमजानच्या सदिच्छा दिल्या. रमजान निमित्त बंधुभाव जपत, सर्वधर्म समभावाची शिकवण या इफ्तार पार्टी निमित्त पहावयास मिळाली.

याप्रसंगी मतीन पठाण , एमपीजे अजीम पाशा, राजू,

पटवारी, शेख शब्बीर, आयुब भाई, अफरोज पठाण, अनिल भालेकर, राजेंद्र शर्मा, कैलास भोरे, मोहम्मद नासिर, सादिक मौलाना, शेख अन्सार, संजय खोरे, भापकर सर यांच्यासह अनेक हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

### आ.सुरेश धस यांचे विरुद्ध

कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी भाऊसाहेब लटपटे यांच्या वक्तव्यातून जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे अशा जातीजातीत भांडण लावणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती निवेदन करण्यात आली असून भाऊसाहेब लटपटे यांनी जनतेची कोणती कामे केली आहेत हे सांगावे स्वतः गुंड प्रवृत्तीचे असून आमदार सुरेश धस यांच्यासारख्या पाच टर्म आमदार असलेल्या व्यक्तींवर त्यांनी खालच्या पातळीवर जाऊन टीका करावी हे योग्य नाही भाऊसाहेब लटपटे यांनी अगोदर आपला डीएनए तपासला पाहिजे इतक्या खालच्या पातळीवरील टीका करणे हा प्रकार यापुढे खपवून घेतला जाणार नाही भाऊसाहेब लटपटे म्हणजे वंजारी समाज नसून त्यांनीही तसेच समजू नये आष्टी तालुक्यातील वंजारी समाज हा पूर्णपणे आमदार सुरेश धस यांच्या मागे ठाम उभा असून या भागामध्ये केवळ आमदार सुरेश धस यांनी विकास कामे केलेली आहेत त्यामध्ये पाथर्डी सरहद्द ते पाटसरा रस्ता डांबरीकरण कापशी येथील साठवण तलावाची उंची वाढवणे तसेच अनेक गावातील रस्ते शाळा, बांधकामे, अंगणवाडी, बांधकामे अनेक गावचे पाणीपुरवठा योजना ही कामे आमदार सुरेश धस यांनीच केलेली आहे. आजवर यापूर्वी कोणत्याही आमदाराने न केलेली कामे ही आमदार सुरेश धस यांनी केलेले आहेत आणि यापुढे येथे करणार आहेत असा आम्हाला विश्वास असून यामुळे आमदार सुरेश धस यांची बदनामी खपवून घेणार नाहीत हे भाऊसाहेब लटपटे यांनी ध्यानात घ्यावे असा इशाराही त्यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे या समाज बांधवांमध्येआष्टी दूध संघाचे चेअरमन आजिनाथ सानप, दूध संघ माजी चेअरमन दूध एन टी गर्जे, माजी चेअरमन आत्माराम फुंदे, जि. प.सदस्य रावसाहेब शिरसाठ, माजी संचालक भगवान सांगळे, माजी सरपंच उद्धव गर्जे,दिलीप गर्जे, सुंदरलाल गर्जे,आश्रुबा गोल्हार, विठ्ठल गर्जे, बाळासाहेब वणवे, नारायण वनवे,बबन शेकडे,माजी सरपंच काका गर्जे,शेषराव गर्जेफौजी, अक्षय गर्जे, सारूख मामा,एन व्ही नागरगोजे,माणिक दहिफळे, वसंत मिसाळ,मोहन आघाव, इंद्रजीत गर्जे, बबन शेकडे, अशोक मिसाळ, बाळासाहेब बाबूलाल सांगळे, आदीसह आष्टी तालुक्यातील वंजारी समाज बांधवांचा मोठया प्रमाणात समावेश होता.

### शिवछत्र परिवाराच्या रोजा

मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन केले होते. रमजान महिण्याच्या निमित्ताने शनिवार दि. २२ मार्च रोजी सायं. ६ : ४२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नगर परिषद कॉम्प्लेक्स, गेवराई येथे भव्य इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजा ईफ्तार पार्टिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, मुहम्मद गौस, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, मनोज हजारे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक तात्या आतकरे, तालुका उपाध्यक्ष दत्ताभाऊ दाभाडे, कांतासेठ नवपुते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, माजी नगरसेवक सय्यद नजीबभाई, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, एजाज अत्तार, मुहम्मद आवेज शरीफ, सय्यद शफी अत्तार, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, पत्रकार अयुब बागवान, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, तालुकाध्यक्ष अब्दुल खालेक कुरेशी, धोंडराई सर्कलचे युवानेते अजीम इनामदार, वसीम फारुकी, नवीद मशायक, शेख मोहसीन भाऊ, शेख मकसूद, बागवान समाजाचे अध्यक्ष माणिकसेठ बागवान, अब्दुल सत्तार कुरेशी, जानमोहम्मद बागवान, माजी नगरसेवक मंजूर बागवान, मोहसीन बागवान, शब्बू मशायक, काझी शौकत, गुफरान इनामदार, नईम बिल्डर, नईम बागवान, काझी शफिक काझी शकील यांच्यासह गेवराई शहर व तालुक्यातील रोजदार मुस्लिमबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

### श्री चक्रधर विद्यालयातील

कुमारी अक्षरा मैड इयत्ता सहावी बुधनर कल्याणी, शिवम कुटे, यादव राम, इंदुरे सार्थक ,श्रीहरी नागरगोजे,करण राठोड, विशाखा पवार यांचा समावेश आहे तर द्वितीय श्रेणीमध्ये मैंदाड आदिती, समर्थ जाधव, ओम क्षीरसागर ,सत्यम कुटे, विराट जाधव,कार्तिक सोळुंके या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

त्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.मोहनराव शिरसाठ यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विषयाच्या शिक्षिका श्रीमती यादव ए.डी . यांनी सर्व विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली व मार्गदर्शन केले. याबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ,सचिव ,सर्व पालक व विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत व भविष्यात अशाच परीक्षेचे आयोजन सातत्याने करावे जेणेकरून विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

### आ. विजयसिंह पंडित यांच्या

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण संचालक जगन्नाथ शिंदे, श्रीराम आरगडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, निपाणी जवळक्याचे ग्राम दैवत श्री ज्योतीबारायांच्या यात्रे साठी या गावामध्ये मी गेले कित्येक वर्षापासून येत आहे. यात्रे मध्ये बारा गाड्या ओढण्याचा मान मला दिला जातो हे मी कदापीही विसरणार नाही. येणा-या काळामध्ये निपाणी जवळका येथील मारुती मंदिर सभामंडप, श्री ज्योतीबारायांच्या मंदिराकडे जाणारा रस्ता, दलीत समाजासाठी स्मशानभूमी व औरंगपुर तांड्यावरील स्मशानभूमीचे बांधकाम केले जाईल. निपाणी जवळका ह्या गावाचे शिवछत्र परीवारा समवेत कायम जिव्हाळ्याचे संबंध आहेत. विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी ग्रामस्थांच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबुराव सावंत, बळीभाऊ चव्हाण नवनाथ वेताळ, सरपंच विष्णुपंत घोंगडे, अशोक नाईकवाडे, अंकूश गायकवाड रामदास मुंढे, मंगेश कांबळे, महादेव जाधव, विलास माने, बाबुराव काकडे, राम लोणकर, कचरू काकडे, शिवाजी आतकरे, ज्ञानेश्वर काकडे, आसाराम काकडे, कल्याण ढेरे, दिलीप कुलकर्णी सखाराम लोणकर, अजय लोणकर, बाळु ढेरे, सरपंच मोहन काकडे उपसरपंच बाबासाहेब राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# निर्यात शुल्क हटवल्याने कांदा निर्यातीचा मार्ग मोकळा

## पोषक हवामान असल्याने उत्पादनही वाढणार - मंत्री जयकुमार रावल

मुंबई : केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क पूर्णपणे हटवले आहे. त्यामुळे आता कांदा निर्यातीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला असल्याचे मत राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले. राज्यात कांदा पिकाची लागवड जास्त झाली आहे, तसेच पोषक हवामान असल्याने उत्पादन जास्त होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या भावात शेतकऱ्यांची कोंडी होऊ नये म्हणून कांदा पिकावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले जावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती असे रावल म्हणाले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या मार्गदर्शनात केंद्र सरकारला निर्यात शुल्क हटवण्याच्या बाबत विनंती केली होती. केंद्र सरकारने शेतकऱ्यांची मागणी लक्षात हे निर्यात शुल्क पूर्णपणे हटवले आहे. १ एप्रिल २०२५ पासून निर्णयाची अंमलबजावणी होणार असल्याचे मंत्री जयकुमार रावल म्हणाले.

त्याचबरोबर केंद्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता अत्यंत महत्त्वाचा



निर्णय घेतल्यामुळे मंत्री रावल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, कृषीमंत्री शिवराज सिंग चव्हाण, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांचे आभार मानले आहेत. निर्यात शुल्क हटवल्यामुळं निर्यातीला प्रोत्साहन मिळणार आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या मार्गदर्शनात केंद्र सरकारला कांद्यावरील निर्यात शुल्क हटवण्याची मागणी केली होती. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर रब्बी कांद्याची लागवड झालेली आहे. कांद्याला पोषक हवामान असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढणार आहे.

राज्याच्या बाजारपेठेमध्ये कांद्याची आवक वाढायला सुरुवात झालेली आहे. महाराष्ट्राबरोबरच मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थानमध्ये नवीन कांद्याची आवक झपाट्याने वाढत असल्याने बाजारात कांद्याचे भाव कमी होणार नाही, या दृष्टिकोनातून केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय मागणीनुसार निर्यातीचा मार्ग मोकळा झालेला आहे. महाराष्ट्रासह देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे असे मंत्री रावल यांनी सांगितले. यंदा कांद्याखालील लागवड क्षेत्र मागील वर्षाच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढले आहे, त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणार आहे असे रावल म्हणाले.

## जनावरांना गूळ खाऊ घालण्याचे फायदे, तोटे



बरेच पशुपालक आपल्या जनावरांना गुळ खाण्यासाठी देतात. गुळामध्ये कॅल्शियम जास्त असते असे, अनेक पशुपालकांना वाटते. परंतु गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण किती असते व तो किती व कधी खायला द्यावा, याबाबत माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

गुळामध्ये असणारे अन्नघटक : गुळामध्ये ८० टक्के सुक्रोज, १० टक्के ग्लुकोज व फ्रुक्टोज, ५ ते ७ टक्के पाणी आणि उरलेले ३ टक्के क्षार घटक असतात. १०० ग्रॅम गुळामध्ये ४० ते १०० मि.ग्रॅ. कॅल्शियम असते. म्हणजे १ किलो गुळ जनावरांना खाऊ घातल्यास फक्त १ ग्रॅम कॅल्शियम मिळते. त्याचबरोबर मॅग्नेशियम, फॉस्फरस, सोडियम यांचे देखील प्रमाण ३० ते १०० मि.ग्रॅ प्रति १०० ग्रॅम असते. लोह १०-१३ मि.ग्रॅ. प्रति १०० ग्रॅम असते. दुधाळ जनावरांना २० ते २५ मि.ग्रॅ. लोह आवश्यक असते. त्यामुळे गुळामधून जनावरांना लोह चांगल्या प्रमाणात मिळते. परंतु हा गुळ लोखंडाच्या कढईत पारंपरिक पद्धतीने बनवला असेल तरच त्या गुळामध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. गुळातील अन्नघटकाचा विचार केला तर गुळामधून जनावरांना कॅल्शियम नगण्य प्रमाणात मिळते.

जनावरांना गुळ खायला द्यावा की नाही : गुळामध्ये शर्करेचे प्रमाण जास्त असल्याने जनावरांना थोड्या प्रमाणात गुळ खायला दिल्याने लगेच ऊर्जा मिळते. परंतु जनावरांना गरजेपेक्षा जास्त म्हणजे २०० ग्रॅम पेक्षा जास्त गुळ खायला दिला आणि त्याचबरोबर सकस हिरवा चारा दिला तर जनावरांच्या पोटामध्ये शर्करेचे प्रमाण वाढते. पोटातील जिवाणू लॅक्टीक असिड मोठ्या प्रमाणावर तयार करतील, त्यामुळे असिडोसिस होण्याची शक्यता असते. असिडोसिसमुळे जनावरांचे पचन बिघडते. त्यामुळे जनावरांना गरज असेल तरच व प्रमाणात गुळ देणे महत्त्वाचे आहे.

जनावरांना गुळ कधी खाऊ घालावा : जनावरे विल्यानंतर जनावरांना मोठ्या प्रमाणात ऊर्जा मिळणे गरजेचे असते. कारण जनावर विण्याच्या अगोदर कमी प्रमाणात चारा खाते किंवा चारा खात नाही. वासराचे वजन जनावराच्या कोटीपोटावर पडल्यामुळे जनावराची चारा खाण्याची व रवंथ करण्याची क्षमता कमी झालेली असते. जनावर विल्यानंतर गर्भाशयातून रक्तस्राव होतो त्यामुळे जनावरे व्यायलानंतर जनावराला लवकर ऊर्जा मिळण्यासाठी गुळ खायला देणे फायदेशीर असते.

गुळ कसा खायला द्यावा : जनावर व्यायल्यानंतर कोमट पाण्यामध्ये २०० ग्रॅम गुळ विरघळवून जनावरांना द्यावा. त्याचबरोबर २०० ते २५० ग्रॅम तृणधान्याच्या लापशीमध्ये १०० ग्रॅम गुळ घालून व्यायलेल्या जनावराला द्यावा. जनावरांना बनवलेल्या लापशीमध्ये २०० ते २५० ग्रॅमपेक्षा जास्त तृणधान्याचे प्रमाण असू नये. गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण हे फार कमी असते, त्यामुळे जनावरांमधील कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी गुळाचा वापर करू नये.

## शेतकऱ्यांनो, खताचे पैसे वाचविण्यासाठी हे करा

अलीकडच्या काळात अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. सेंद्रिय शेती मधून येणाऱ्या पिकाला बाजारात भावसुद्धा चांगला मिळत असल्याने यावर भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता आहे. सेंद्रिय शेतीसाठी जमिनीतील सेंद्रिय घटक फार महत्वाची भूमिका पार पाडतात. आता जमिनीतील हे सेंद्रिय घटक कसे वाढवायचे याबाबत माहिती जाणून घेतल्यास शेतकऱ्यांचा खतासाठी होणारा खर्च वाचणार आहे.



उष्ण हवा आणि कमी पाऊस यांमुळे अधिकतर क्षेत्रातील सेंद्रिय घटकांचे भस्मीकरण जलद गतीने होते. सेंद्रिय भागाचे विघटन व भस्मीकरण होणे ही बाब महत्त्वाची आहे. पण उष्ण हवेत ही प्रक्रिया फार जलद होते. त्यामुळे सेंद्रिय घटक तयार होण्याच्या क्रियेत समतोलपणा राहत नाही. हा समतोलपणा येण्यासाठी खालील उपायांचा अवलंब करावा.

१) जमिनीस अधिक प्रमाणात सेंद्रिय खते किंवा भरखते पुरविली पाहिजेत. भरखते ही एकाच वेळी भरपूर प्रमाणात न देता ती प्रत्येक पिकास टप्प्याटप्याने परंतु नियमितपणे द्यावीत. २) जमिनीतील सेंद्रिय घटक नैसर्गिक हवामान बदलावर अवलंबून असल्याने त्याचे प्रमाण वाढविणे अशक्यप्राय आहे. परंतु त्याचा समतोल राखला जाईल यासाठी कंपोस्ट खत, शेणखत, पालापाचोळा, पिकांचे अवशेष वगैरेंचा वापर करावा. ३) धैंचा, ताग, शेवरी, बरबडा तसेच पार्थेनियम यासारख्या हिरवळीच्या खतांची लागवड करून ती पिके फुलोऱ्यात येताच जमिनीत गाडावीत. हिरवळीची पिके पेरताना व नांगरून टाकताना फॉस्फेटयुक्त खते द्यावीत किंवा हिरवळीचे पीक गाडल्यानंतर घेण्यात येणाऱ्या पिकांच्या स्फुरदाची खत मात्रा हिरवळीच्या खतात द्यावी. ४) कडधान्यवर्गीय गवते उदा. टाकळा, तरवड, बरबडा फुलोऱ्यात येण्यास सुरुवात होत असताना अथवा पार्थेनियमसारखी पिके फुलोऱ्यापूर्वी शेतात गाडल्यास त्यापासूनही जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविता येते. ५) सुबाभूळ अथवा गिरीपुष्प यांसारखी झाडेसुद्धा बांधावर लावून त्यांची एक मीटरवर वारंवार छाटणी करून त्यांच्या कोवळ्या फांद्या शेतात नुसत्या पसरल्या तरीही त्यांचा तिहेरी फायदा होतो. पहिला फायदा जमिनीवर आच्छादन करता येते. त्यामुळे पावसाच्या थेंबाने होणारी मातीची धूप थांबविता येते. तसेच जमिनीत जास्त पाणी मुरविता येते व बाष्पीभवनामधून उडून जाणाऱ्या पाण्याचे संवर्धन करता येते. तसेच या फाद्यांचे कर्ब- नत्राचे गुणोत्तर कमी असल्यामुळे त्याचे दीड ते दोन महिन्यांत भस्मीकरण होऊन पुढील पिकास अन्नद्रव्यांचा चांगला पुरवठा होतो व रासायनिक खताची मात्रा कमी करता येते. भस्मीकरणाची क्रिया सावकाश करण्यासाठी जमिनीवर पालापाचोळ्याचा थोडा जास्त थर राहू द्यावा, यालाच इंग्रजीत ऑरगॅनिक मल्च (सेंद्रिय आच्छादन) असे म्हणतात. ६) जमिनीची कमीत कमी मशागत केल्यास सेंद्रिय पदार्थाचा ऱ्हास होत नाही. एकंदरीत जमिनीतील सेंद्रिय घटक हे पीक उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्याची घट वरचेवर भरून काढणे अत्यावश्यक आहे. ज्या शेतीमध्ये जमिनीतील सेंद्रिय घटकांचे प्रमाण कमी होत जाते ती शेती किफायतशीर होऊ शकत नाही. शेतकऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३०७ : देवगिरीचा वैभवशाली सम्राट रामदेवराव यादव यास मलिक काफूरने कैद करुन दिल्लीला नेले. चैत्र व. ४
१६७७ : दक्षिण दिग्विजयप्रसंगी शिवाजी महाराजांनी श्री शैल्य मल्लिकार्जुन येथे मुक्काम केला.
१८५५ : आग्रा आणि कलकत्ता यांदरम्यान तारसेवा सुरू झाली.
१८३६ : कॅनडा देशाने आफ्रिकन कॅनेडियन लोकांना मतदानाचा अधिकार दिला.
१८३७ : कॅनडा देशातील अश्वेत नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१८८३ : शिकागो व न्यूयार्क या दोन शहरादरम्यान सर्वप्रथम दूरध्वनीवर बोलचाल करण्यात आली.
१८९६ : अ.एस. पोपोव यांनी इतिहासात पहिल्यांदाच रेडिओ सिग्नल चे प्रसारण केले.
१९२३ : ग्रीस हे राष्ट्र प्रजासत्ताक बनले.
१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन
१९६२ : जागतिक क्षय रोग दिन
१९७७ : मोरारजी देसाई यांचा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला व काँग्रेसची तीस वर्षाची सत्ता संपुष्टात झाली.
१९९३ : शूमाकर-लेव्ही-९ या धूमकेतुचा शोध लागला. हा धूमकेतु जुलै महिन्यात गुरु ग्रहावर जाऊन आदळला.
१९९८ : 'टायटॅनिक' चित्रपटाला विक्रमी ११ ऑस्कर पुरस्कार मिळाले.
२००८ : भूतान हे लोकशाही राष्ट्र बनले व प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : मुथुस्वामी दीक्षीतार तामिळ कवी व संगीतकार (मृत्यू: २१ आक्टोबर १८३५)
१७९३ : कागदी चलनाचे जनक समजले जाणारे थॉमस रुझवेल्ट.
१८४१ : ब्रिटीश भारतातील मुस्लीम राजनेता व भारतीय मुस्लीम लीगचे संस्थापक नवाब विकार-उल-मुल्क कबोह यांचा जन्मदिन. यांचे मुळ नाव मुश्ताक हुसेन झुबेरी असून त्यांना नवाब विकार-उल-मुल्क मौलवी या नावाने देखील ओळखले जाते.
१८६३ : ब्रिटीश भारतातील एक प्रख्यात वकील आणि राजकारणी सत्येंद्र प्रसन्न सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९२ : भारतीय राजनेता आणि भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता हरिभाऊ उपाध्याय यांचा जन्मदिन. सन १९५२-५६ साली त्यांनी अजमेर राज्याचे मुख्यमंत्री पद भूषविले होते.
१९०१ : अमेरिकन ॲनिमेटर मिकी माऊस चे सह निर्माते अनब्लॉक आय्व्रेक्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९७१)
१९२२ : भारतीय कर्नाटिक संगीतकार तसेच तमिळ चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायक थोगुलुवा मीनाची अयंगर सौन्दराराजन उर्फ टीएमस यांचा जन्मदिन.
१९२४ : ज्ञानपीठ विजेते बिरेंद्रकुमार भट्टाचार्य.
१९३० : स्टीव्ह मॅकक्वीन हॉलिवूड अभिनेता (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८०)
१९५१ : टॉमी हिल्फायगर अमेरिकन फॅशन डिझायनर
१९६५ : अमेरिकन प्रोफेशनल रेसलर व सध्या डब्ल्यूडब्ल्यूई रेसलिग स्पर्धेत कार्यरत असलेले अंडरटेकर या नावाने ओळखले जाणारे मार्क विल्यम कॅलवे यांचा जन्मदिन.
१९६६ : भारतीय राजकारणी व उद्योगपती जयदेव गल्ला यांचा जन्मदिन.
१९७९ : हिंदी चित्रपट अभिनेता इमरान हाशमी यांचा जन्मदिन.
१९८४ : भारतीय हॉकी खेळाडू एड्रियन डिसूझा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०३ : एलिझाबेथ पहिली, इंग्लंडची राणी.
१८४९ : योहान वुल्फगँग डोबेरायनर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १३ डिसेंबर १७८०)
१८८२ : एच. डब्ल्यू. लॉंगफेलो अमेरिकन नाटककार व कवी (जन्म: २७ फेब्रुवारी १८०७)
१९०५ : ज्यूल्स व्हर्न फ्रेन्च लेखक (जन्म: ८ फेब्रुवारी १८२८)
२००७ : श्रीपाद नारायण पेंडसे मराठी कथालेखक व कादंबरीकार (जन्म: ५ जानेवारी १९१३)

# ढोबळी मिरची लागवड पद्धत

महाराष्ट्रात ढोबळी मिरची पक्व असली तरी रंग हिरवागार असल्याने तिचा भाजीशिवाय इतरही उपयोग होतो. ढोबळी मिरची चवीमधील फरक हा मुख्यत्वे करून फळामधील कॅपीसीनच्या प्रमाणावर अवलंबून असते. ते साधारणतः २ ते ४ टक्केपर्यंत असते.

हवामान : ढोबळी मिरचीला दिवसाचे सरासरी तपमान २५ सेल्सिअस व रात्रीचे १४ सेल्सिअस या पिकास उत्तम तापमान असून तापमान १० सेल्सिअस पेक्षा कमी झाल्यास व ठिपके पडल्यास या पिकाच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

जमीन व हंगाम : ढोबळया मिरचीची लागवड ऑगस्ट, सप्टेबर महिन्यात करतात. त्यामुळे फळांची काढणी जानेवारी, फेब्रूवारी या कालावधीत करता येते. ढोबळी मिरचीला जमिन चांगली कसदार व सुपीक लागते. मध्यम ते भारी काळी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमिन या पिकास योग्य आहे. नदीकाठच्या पोयटयाच्या सुपिक जमिनी लागवडीस योग्य आहेत. जमिनीचा सामु ६ ते ७ च्या दरम्यान असावा.

पूर्वमशागत : ढोबळया मिरचीची लागवड रोपे लावून करतात यासाठी एक किंवा दोन आर क्षेत्रावर रोपवाटीका करावी. जमिन चांगली उभी आडवी नांगरून हेक्टरी १५ ते २० टन शेणखत घालावे. पूर्वीच्या पिकांचे धसकटे गोळा करून दोन कुळवाच्या पाळया द्याव्यात.

वाण : कॅलिफोर्निया वंडर - या जातीचे झाड मध्यम उंचीचे उभट वाढणारे असून मिरची गर्द हिरव्या रंगाची असते. या मिरचीचे साल जाड असून फळांना तिखटपणा नसतो. ही उशीरा तयार होणारी जात असून हेक्टरी उत्पादन १२ ते १५ टन मिळते. अर्का मोहिनी - या जातीची फळे मोठी आणि हिरव्या गडद रंगाची असून फळाचे सरासरी वजन ८० ते १०० ग्रॅम असते. या जातीचे हेक्टरी उत्पादन २० ते २५ टन असते. या जाती यलो वंडर, भारत आणि इंद्रा या सारख्या ढोबळया मिरचीच्या संकरीत जाती लागवडीस योग्य आहेत.


बियाण्याचे प्रमाण :दर हेक्टरी ३ किलो बियाणे लागतील. एक किलो बियाण्यास पेरणी करण्यापूर्वी २ ग्रॅम थायरम चोळावे.

खते व पाणी व्यवस्थापन : हेक्टरी १५ ते २० टन शेणखता व्यतिरिक्त १५० किलो नत्र १५० किलो स्फूरद व २०० किलो पालाश ची आवश्यकता असते. पैकी पालाश व स्फूरद यांचा पूर्ण हप्ता व नत्राचा अर्धा हप्ता लागवडीच्या वेळी द्यावा. उरलला नत्राचा हप्ता लागवडीनंतर एक महिन्याने व दुसरा हप्ता ५० दिवसांनी द्यावा. ढोबळी मिरचीला लागवडीपासून सुरुवातीच्या वाढीसाठी भरपूर व नियमित पाण्याची आवश्यकता असते. फूले व फळे लागताना नियमित पाणी दयावे. सर्वसाधारपणे एक आठवडयाचे अंतराने पाणी दयावे.

आंतरमशागत : ढोबळी मिरची चुरडा मुरडा या रोगास बळी पवडत असते. त्यासाठी मिरचीचा मळा नेहमी स्वच्छ असणे आवश्यक असते. त्यासाठी सुरुवातीच्या काळास जरूरीप्रमाणे दोन तीन वेळा निंदणी करावी. तसेच झाडांना मातीचा भक्कम आधार द्यावा.

रोग व किड : मर या रोगामध्ये शेंडयाखालील भाग वाळत जातो. हा रोग फायटोप्थोरा या अळिंबीच्या प्रकारामुळे होतो. रोगग्रस्त झाडे समुळ नष्ट करावीत व राहिलेल्या झाडांच्या मुळाजवळ ०.६ टक्के तीव्रतेने बोर्डो मिश्रण ओतावे. बोकडया हा व्हायरस रोग असून या विषाणूंचा प्रसार माव्याच्या किडीमार्फत रोगट झाडा पासून चांगल्या झाडाकडे होत असतो. या रोगामुळे पाने आखडून झाडांची वाढ खुंटते. झाडांना फूले येत नाहीत. व उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. रोगग्रस्त झाडे समुळ उपटून नष्ट करावीत. १ किलो मोनोक्रोटोफॉस प्रति लिटर पाण्यात या प्रमाणात घेऊन झाडांवर दर १५ दिवसांचे अंतराने नेहमी फवारणी करावी.

काढणी व उत्पादन : फळे हिरवीगार व संपूर्ण वाळलेली असल्यास फळांची काढणी करावी. त्यासाठी फळांच्या टोकांच्या वाळलेल्या स्त्री केसरांचा भाग गळून पडलेला असावा. फळे झाडावर जास्त काळ ठेवल्यास ती पिकतात. काही देशात लाल फळांना जास्त मागणी असते. परंतु यामुळे पुढील फळांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो व उत्पादन कमी मिळते. फळे झाडावरून देठासहीत काढावीत. साधारणपणे दर ८ दिवसांनी फळांची काढणी करावी. अशा ४ ते ५ काढणीत सर्वर पिक निघते. प्रति हेक्टरी ढोबळया मिरचीचे १७ ते २० टनापर्यंत सरासरी उत्पादन मिळते.




# जुन्या मोंढ्यातल्या दोन किराणा दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडल्या

## नगदी ९५ हजार रोकड पळवली: शहरात बसवलेल्या ५ कोटीच्या कॅमेऱ्याचा उपयोग काय?








माजलगाव । प्रतिनिधी

शहरात मुख्य रस्त्या वरील जुन्या मोढ्यात दि २३ मार्च रविवार रोजी पहाटे ३:०० ते ३:३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दोन किराणा दुकानाचे शटर तोडले.दरम्यान यावेळी चोरट्यांनी दोन दुकानातील सामानाची नासधूस करत गल्ल्यात असलेले ९५ हजार ५००/ रुपये रोकड लंपास केली.

याबाबत माहिती अशी की,शहरात मुख्य रहदारीच्या ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकालगत जुन्या मोंढ्यात दिलीप बबनआप्पा खुरपे यांचे चंद्रशेखर किराणा दुकान आहे.तर लक्ष्मीकांत रामहरी झुंजुर्के यांचे न्यू लक्ष्मीकांत ट्रेडिंग कंपनी नावाचे किराणा दुकान आहे.सदरील दुकानदार दि.२२ मार्च शनिवार रोजी दिवसभर व्यावसाय करून रात्री ८:३० वाजता आपले दुकान बंद करून घरी गेले होते.दरम्यान दि २३ मार्च रविवार रोजी सकाळी ७:३० वाजता चंद्रशेखर किराणा दुकानचे मालक दिलीप बबनआप्पा खुरपे यांना फोनवरून माहिती मिळाली की,त्यांचे दुकान अर्धवट उघडलेले दिसत आहे.या माहितीवरून खुरपे तात्काळ दुकानात आले.त्यावेळी त्यांना दुकानाच्या शटरचे कुलूप तोडल्याचे व दुकानाल्या सामानाची नासधूस झाली असल्याचे दिसले.तर गल्ल्यातील ८० हजार ५००/ रुपये चोरी झाली असल्याचे दिसले.त्याचप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीसीआरही चोरून नेण्यात आला.तर दुसरे झिंजुर्के यांचे न्यू लक्ष्मीकांत किराणा दुकानातही हीच परिस्थिती दिसून आली.झिंजुर्के यांच्या दुकानाच्या गल्ल्यातूनही नगदी १२ हजार रुपये चोरट्यांनी पळवले.दिलीप बबन आप्पा खुरपे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरोधात माजलगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान शहराच्या निगराणीसाठी डीपीडीसीच्या माध्यमातून शहरात ५ कोटीचे कॅमेरे बसवण्यात आले आहेत.परंतु तरीही शहरात चोऱ्याचे प्रमाण वाढत आहे.त्यामुळे पाच कोटीच्या कॅमेऱ्याचा उपयोग काय?असा प्रश्न शहरातील व्यापाऱ्यांना पडला आहे.

# महेश सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याचा मानस-धोंडे



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला महेश (कडा) सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू करण्याचा मनोदय माजी आमदार भीमराव धोंडे यांनी बोलून दाखवला. रविवारी कडा येथे एका कार्यक्रमासाठी आले असताना या कार्यक्रमादरम्यान बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले. माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने साखर कारखाना सुरू होणे महत्त्वाचे आहे.

स्वतःच्या कार्यक्षेत्रात साखर कारखाना नसेल तर बाहेरच्या कारखान्याला ऊस देताना अनंत अडचणीचा सामना करावा लागतो.उसतोड उशिरा होते.भाव चांगला मिळत नाही.पैसे वेळेवर मिळत नाहीत त्यामुळे आपला हक्काचा कारखाना असणे महत्त्वाचे आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे २००७ पासून महेश ( कडा ) सहकारी साखर कारखाना बंद होता आणि त्यानंतर महाराष्ट्र सहकारी बँकने कारखाना ताब्यात घेतला होता. कारखाना एनपीएत गेला होता त्यानंतर ब-याचदा हा कारखाना भाडेतत्वावर चालविण्यास देण्यासाठी अनेकदा टेडंर काढण्यात आले होते.कोणीही कारखाना चालविण्यास घेतला नाही म्हणुन विद्दमान संचालक मंडळानेच आता हा कारखाना चालविण्याचा निर्णय घेतला आहे. हा कारखाना सुरू होण्यासाठी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्याशी चर्चा देखील केली आहे.लवकरच याविषयी सविस्तर कार्यवाही संदर्भात भेटणार आहे. हा कारखाना सुरू करण्याचा अन्य कोणाचा इरादा असेल तर आपण त्यालाही आडकाठी आणणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले . साखर कारखाना सुरू राहिला तर फक्त कामगार आणि शेतकरी यांचाच फायदा होतो असे नाही तर इतर अनेकांनाही वेगवेगळ्या माध्यमातून रोजगार प्राप्त होत असतो.त्यामुळे आष्टी तालुक्यातील साखर कारखाना सुरू झाला तर त्याचे जनतेकडून स्वागतच होणार आहे.

# युवक तालुका संघटकपदी विनोद गायकवाड

## मानवी हक्क अभियान संघटनेकडे युवकांचा मोठा कल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या फुले पिंपळगाव येथील आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते विनोद गायकवाड यांची मानवी हक्क अभियान संघटनेच्या युवक तालुका संघटक पदी निवड करण्यात आली.मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड यांच्या यांच्या आदेशाने मानवी हक्क अभियानाच्या युवक तालुका संघटकपदी विनोद गायकवाड यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी मानवी हक्क अभियानचे तालुका अध्यक्ष मधुकर कांबळे, वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले,

धारूर तालुकाध्यक्ष किसन लोखंडे, तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब थोरात, तालुका सचिव



कपिल आडगळे, युवक नेते रमेश जाधव,ज्येष्ठ नेते रमेश गवळी,प्रल्हाद दळवी,शहराध्यक्ष संदीप वाघमारे, बबन खंडागळे, पत्रकार आनंत घडसिंगे,पत्रकार मच्छिंद्र उफाडे , पत्रकार सुनील थोरात,अंजन कांबळे,अशोक लोंढे,सुंदर भिसे,भारत जाधव,सौरभ गायकवाड,प्रदीप खंडागळे,अनिकेत वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा

माजलगाव । प्रतिनिधी

आगामी शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात संपन्न झाला.या पालक मेळाव्याची सुरुवात सांघिक पद्य,माता सरस्वती, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. यावेळी पालक मेळाव्याचे अध्यक्ष माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, पालक प्रतिनिधी श्रीमती भाग्यश्री शिंदे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी श्रीमती अंजली शेंडगे, श्रीमती तांबुड या पालकांनी आपल्या मनोगतातून विधायक सूचना केल्या तसेच शाळा गुणवत्ता वाढीसाठी घेत असलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा केली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर यांनी सांगितले की, पालकांचा आपल्या



पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वारंवार शिक्षकांशी संपर्क व संवाद असावा. पालकांनी आपल्या पाल्यांच्या क्षमता ओळखून अपेक्षा ठेवल्या पाहिजेत. माजलगाव शहर हे विद्येचे माहेरघर व्हावे यासाठी शिक्षक पालक विद्यार्थी यांचे प्रयत्न असणे गरजेचे आहे. तसेच वर्षभरात शनिवार चाचणी परीक्षा, सराव परीक्षा,घटक चाचण्या,तज्ञ शिक्षकांचे समुपदेशन,उन्हाळी वर्ग,रात्र अभ्यासिका इत्यादी उपक्रमांची माहिती दिली.या पालक मेळाव्याचे अध्यक्षीय समारोप करताना प्रशांत भानप यांनी सांगितले की, विद्यार्थी शिक्षक व पालक हा त्रिकोण महत्त्वाचा आहे. जिद्द,चिकाटी आणि आत्मविश्वास या बळावर उत्तुंग यश हमखास प्राप्त करता येते. प्रास्ताविक करताना उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे यांनी सांगितले की, पालकांनी आपला पाल्य शाळेत पोहोचला व शिक्षकांनी विद्यार्थी घरापर्यंत पोहोचला म्हणजे सर्व काही संपले असे म्हणून चालणार नाही. पाल्याचे मित्र वर्तुळ,त्याचे आरोग्य,आहार व विहार याकडे लक्ष देऊन वेळोवेळी होत असलेल्या पालक मेळाव्यास उपस्थित राहावे व पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करणे आवश्यक आहे.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सुत्रसंचलन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी केले. मेळाव्याची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला. यावेळी माता पिता पालक इयत्ता पाचवी ते दहावी चे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाची कला शाखेची शैक्षणिक सहल

धारूर

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर येथील कला शाखेची शैक्षणिक सहल प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे व उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य. डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांनी सहल निघण्यापूर्वी सहलीतील सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाची सहल जीवनातील एक महत्त्वाची आठवण असते असे सांगून पुढील प्रवासास शुभेच्छा दिल्या.

अध्यात्मिकदृष्ट्या आणि पर्यटनाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असणारे ठिकाण कपिलधार, चाकरवाडी तसेच केजतील श्री. भगवान श्रीकृष्ण आश्रम या ठिकाणी विद्यार्थ्यांनी अभ्यास सहल निमित्ताने भेटी दिल्या. त्या ठिकानाचे असणारी ऐतिहासिक मंदिरे यांची ओळख तेथील पुजाऱ्यांनी करून दिली. तसेच केज येथील श्री. भगवान श्रीकृष्ण आश्रम माचे संचालक श्री. केशव महाराज यांनी विद्यार्थ्यांना आश्रमाविषयी आश्रमातील विविध झाडांविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्याचबरोबर सहलीतील विद्यार्थ्यांना विद्यार्थी जीवनात ज्ञानाला किती महत्त्व आहे. याची वेगवेगळी उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर भारतीय संस्कृतीचं जतन, आई-वडील यांचा आदर आणि राष्ट्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी आजच्या युवक पिढीवर आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. आपल्या सोबतीचे मित्र सुसंस्कृत असावेत त्यांच्याशी आपण मैत्री करावी असे मार्गदर्शन श्री. केशव महाराज यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी कला शाखेचे प्राध्यापक प्रा. विनायक कापावार, प्रा. बालासाहेब जोगदंड, श्री. कणसे सर, डॉ. कणसे मॅडम, आश्रमातील इतर कर्मचारी उपस्थित होते. या शैक्षणिक सहलीत विद्यार्थिनीने भरभरून प्रतिसाद दिला.

# मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन पवार यांची निवड

## उत्कृष्ट लेखणी, उत्कृष्ट वकृत्व आणि उत्कृष्ट संघटनच्या बळावर निवड

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेत सचिन पवार यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीमध्ये पत्रकारितेतील अनुभवी आणि सक्रिय व्यक्तींना संधी देण्यात आली आहे. सचिन पवार हे पत्रकारितेतील एक अनुभवी आणि पत्रकारांच्या कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग घेणारे कार्यकर्ते असून, पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि समाजातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर नेहमीच त्यांचा सकस आवाज राहिला आहे.नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी प्रभावी काम करण्यात येईल, असे अपेक्षित आहे. सचिन पवार यांना जिल्हा उपाध्यक्षपद मिळाल्याबद्दल सर्व पत्रकार व संघटनेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, पुढील कार्यकाळात त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांसाठी नवीन संधी आणि सुविधा उपलब्ध होतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.



पाटोदा तालुक्यातील पत्रकार सचिन पवार यांनी लेखणीच्या बळावर आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी पाटोदा तालुक्याचे अध्यक्ष पद भूषवलं असून आता त्यांना जिल्ह्याचे उपाध्यक्ष पद मिळाल आहे. उत्कृष्ट लेखणी उत्कृष्ट वकृत्व आणि उत्कृष्ट संघटन या त्रिवेणी संगम मुळे त्यांना परिषदेने जिल्हा उपाध्यक्ष करून नवीन जबाबदारी सोपवली आहे, ती जबाबदारी सचिन पवार खंबीरपणे पार पाडतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे. माझी लेखणी, वकृत्व आणि संघटन या बळावर एस एम देशमुख सरांनी पाटोदा तालुक्याची जबाबदारी माझ्यावर देऊन माझ्यावर विश्वास दाखवला होता तसेच यावेळेस जिल्हा उपाध्यक्ष करून त्यांनी माझ्या जबाबदारीत अधिक भर टाकली आहे, प्रथमता एस एम देशमुख सरांचे व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो तसेच टाकलेली जबाबदारी खंबीरपणे पार पाडेल आणि संघटनेच्या अभिमानात भर पडेल असं कार्य माझा हातून घडेल असा विश्वास पूर्ण शब्द देतो अशा भावना नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष सचिन पवार यांनी व्यक्त केले आहे.

# शासकीय धान्य गोदामातील हमाल संपावर

पाटोदा । प्रतिनिधी

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना असल्याने शासकीय धान्य गोदामातील हमाल संपावर असल्याने मार्च महिना संपत आला तरी पण पुरवठा विभाग व हमाल संघटना यांच्यात तोडगा निघाला नाही तरी जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख साहेब यांनी यावर चर्चा करून तात्काळ मार्ग काढावा कारण शहरी भागासह ग्रामीण भागात पण मुस्लिम समाज असल्याने अद्याप ग्रामीण भागातील दुकानदार यांना धान्य मिळाले नाही फेब्रुवारी महिन्यात ज्वारी आल्याने अनेक दुकानदार यांना उशिरा धान्य मिळाले व मशिन सर्व्हर डाऊन असल्याने व केंद्र सरकारने धान्य वाटप करण्यासाठी मुदतवाढ न दिल्याने ग्रामीण भागातील अनेक कार्ड धारक फेब्रुवारी महिन्यात धान्यावाचुन वंचित राहिले हिच परिस्थिती या महिन्यात ऊदभवली आहे आज मार्च महिना संपत

आला तरी पण हमाल संघटनेने संप मागे घेतला नाही परिणामी केंद्र सरकार धान्य वाटप करण्यासाठी मुदतवाढ देतील किंवा नाही हे माहिती नाही तरी पुरवठा विभागाने तातडीने पाऊल उचलत योग्य तो निर्णय घ्यावा जर शासकीय हमाल संघटना संप मागे घेत नसतील तर पुरवठा विभागाने ईतर हमाल तात्पुरते पर्यायी व्यवस्था म्हणून उपलब्ध करून तात्काळ धान्य वाहतूक सुरू करावी असे शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड तालुका अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# तुलसी शैक्षणिक समूहास लोकमत ग्लोबल कन्व्हेन्शन-समिट अँड अवॉर्ड्‌र्स पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणाच्या माध्यमातून हजारो जीवनांना प्रकाशमय भविष्याची दिशा देणारे देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांना सोमवार, १७ मार्च रोजी हाँगकाँग-मकाऊ येथे लोकमत समूहाच्या वतीने आयोजित ''लोकमत ग्लोबल कन्व्हेन्शन-समिट अँड अवॉर्ड्स २०२५'' या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. सदरील पुरस्कार हा प्रसिद्ध अभिनेता सोनू सुद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती आणि संस्था यांचा सहभाग होता. ज्यात, तुलसी शैक्षणिक समूहाच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला.

प्रा.प्रदीप रोडे यांच्या नेतृत्वाखाली तुलसी शैक्षणिक समूहाने गेल्या ३५





वर्षांपासून शिक्षण आणि समाजसेवेच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवून हजारो लोकांचे जीवन संपन्न केले आहे. शिक्षण क्षेत्रात अथक परिश्रम करून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने परदेशी भाषा, इंग्रजी भाषा, संगणकशास्त्र, फॅशन डिझाईन आणि वैद्यकीय अभ्यासक्रम यासारख्या आधुनिक विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तुलसी समूहाचे त्यांचे कार्य हे केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित केले आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी गरिबांना आर्थिक मदत, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप आणि मोफत धान्य वितरण करून हजारो कुटुंबांच्या पोटाची आग शमवली. याशिवाय, महिला सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम राबवून महिलांना समाजात समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. तसेच, संस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन योजना राबवून त्यांचा नैतिक दर्जा उंचावला आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल तुलसी शैक्षणिक समूहातील शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, मित्र परीवार आणि समाजातील नागरिकांनीही या सन्मानाचे स्वागत करून अभिनंदन व्यक्त केले. यावेळी धन्यवाद देताना प्रा.रोडे यांनी सांगितले,''हा पुरस्कार केवळ माझा नाही, तर तुलसी शैक्षणिक समूहाचा, सर्व सहकारी मित्र, विद्यार्थी आणि समाजाचा आहे. तुमच्या सहकार्याशिवाय हे यश शक्य नव्हते. आपण सर्वजण एकत्र येऊन समूहाच्या उद्दिष्टांसाठी काम केले, त्यामुळेच आज आपण देशपातळीवर आपली ओळख निर्माण करू शकलो आहोत.'' या यशामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण झाला असून तुलसी समूहाने भविष्यात आणखी मोठे लक्ष्य गाठण्याचे आत्मविश्वासाने आवाहन केले आहे.

# बाळूमामाच्या भंडाऱ्यासाठी सहा क्विंटल तांदुळ दान



बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र आदमापूर ता. भुदरगड जि.कोल्हापूर येथे श्री संत बाळूमामांच्या मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे भंडारा यात्रा महोत्सव होणार आहे या महोत्सवासाठी देशभरातून लाखो भाविक भक्त उपस्थिती लावत असतात यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविक भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येते त्या अनुषंगाने बग्गा क्रमांक ९ चे कारभारी आप्पासाहेब माळी व उपकारभारी तानाजीराव पाटील यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली बीड व धाराशिव जिल्ह्यातील बालाघाट परिसरातील भक्तांकडून साडेपाच टन तांदूळ श्रीक्षेत्र आदमापुर येथे जाऊन बाळूमामांच्या चरणी अर्पण करण्यात आला यामधे खारीचा वाटा म्हणून अंजनवती,घारगाव व काटवटेवस्ती ग्रामस्थांकडून सहा क्विंटल ३० किलो २८ हजार ६६५ रुपये किमतीचा तांदूळ श्री संत बाळूमामांच्या दरबारात हजेरी लावून अर्पण करण्यात आला यावेळी बालाघाटावरील श्री संत बाळूमामांच्या अनेक प्रमुख भक्तांची उपस्थिती होती.

# पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना फसवले मावेजापोटी दिलेले धनादेश वठलेच नाहीत

## बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार; जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय-डॉ.ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१००००२८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८ , शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वठलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या



आधिका-यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार अंबादास ढास यांनी केली आहे. उभ्या ज्वारीच्या पिकातुन गाड्या घातल्या कडब्याचे नुकसान झाले त्याचीही भरपाई अद्याप दिलीच नाही :- संदिप ढास

महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत.या प्रकरणी ऊद्या सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले.

### जिल्हा प्रशासनाची भुमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय, पवनचक्की कंपन्यांची पाठराखण तर पिडीत शेतकऱ्यांना वालीच नाही

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिल्हा प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

गेवराई । प्रतिनिधी

मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराच्या वतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला हिंदू अणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, जयसिंग पंडित युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित





यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदु बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यामुळे शिवछत्र परिवाराच्या या इफ्तार पार्टीत हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्य पुन्हा एकदा दिसुन आले.माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबीय व शिवछत्र परिवाराच्या वतीने सालाबादाप्रमाणे

◀◀ पान ३ वर

# आ.सुरेश धस यांच्याविरुद्ध गरळ ओकणारे भाऊसाहेब लटपटे यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करा

## वंजारी समाज बांधवांचे आष्टी पोलीस स्टेशन येथे निवेदन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री सुरेश रामचंद्र धस यांची बदनामी करणाऱ्या भाऊसाहेब लटपटे यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आष्टी तालुक्यातील वंजारी समाजातील समाज बांधवांनी आष्टी पोलीस स्टेशन येथे एका निवेदनाद्वारे केली आहे.





या निवेदनामध्ये म्हटले आहे की, आष्टी विधानसभा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आमदार सुरेश धस यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड मतांनी विजय मिळवलेला असूनही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते भाऊसाहेब लटपटे त्यांची सतत बदनामी करणारे वक्तव्य करत आहेत त्यांच्याविरुद्ध गरळ ओकत आहेत

वास्तविक पाहता भाऊसाहेब लटपटे हेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांचेवर आत्तापर्यंत आष्टी आणि अंभोरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे नोंदवण्यात आलेले असून त्यांना एका गुन्ह्यामध्ये शिक्षा सुनावण्यात आलेली आहे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने आमदार सुरेश धस यांच्यासारख्या लोकप्रतिनिधीवर बिनबुडाचे आरोप करून त्यांची बदनामी करू नये भाऊसाहेब लटपटे यांनी त्यांच्या लायकीप्रमाणे वक्तव्य करावीत भाऊसाहेब लटपटे हे वेळोवेळी यूट्यूब चैनल आणि जमेल त्या ठिकाणी आमदार सुरेश धस यांची बदनामी होईल असे वक्तव्य करत आहेत त्यामुळे त्यांचे विरुद्ध

◀◀ पान ३ वर

# 'तेजस'च्या अध्यक्षपदी ॲड. प्रकाश कवठेकरांची फेरनिवड

**बीड । प्रतिनिधी**

तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा ॲड.प्रकाश कवठेकर यांची निवड झाली आहे. मागील आठ वर्षात तेजस अर्बनने आपली पत कायम राखली आहे.

तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीच्या मुख्य शाळेत पदाधिकारी यांच्या निवडीसाठी बैठक आयोजित केली होती. यावेळी उपाध्यक्षपदी दत्ता सर्जेराव घरत तर सचिवपदी रामदास सुंदर ठोसर यांची निवड केली. ॲड.प्रकाश कवठेकर यांनी मागील आठ वर्षापुर्वी तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. बीड, डोंगरकिन्ही,



वैद्यकिन्ही, उखंडा अशा चार ठिकाणी चार शाखा उघडण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी ठेवीदार मोठ्या विश्वासाने व्यवहार करत आहेत. ॲड.कवठेकर यांनी तेजस अर्बनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरूण आणि बचतगटातील सदस्यांच्या हाताला काम देण्यासाठी आणि उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप केले आहे. यामुळे तेजस अर्बन नावारूपाला आली आहे. ॲड.प्रकाश कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेल्या बैठकीला पीठासन अधिकारी म्हणून एस.एस.सांगुळे हे होते तर उपस्थित जेष्ठ संचालक शिवाजी लोखंडे, बाबुराव कदम, ज्ञानेश्वर आगे, कैलास किर्दात, रामेश्वर गाडे, दिनेश जाधव, लिंबाजी भोंडवे आदी उपस्थित होते.

# धारदार कोयता बाळगून दहशत माजवणाऱ्या तरुणाला पोलीसांनी पकडले

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव धरण परिसरात धारदार कोयता बाळगत दहशत माजवणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी जेर बंद करून त्याविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.



माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना गोपनीय माहिती मिळाली की,ईसम नामे शेख रेहान शेख हारून रा.फुलेनगर माजलगाव हा धरण परिसर येथे हातात कोयता घेवुन दहशत माजवत आहे.या मिळालेल्या माहितीवरून दि.२२ मार्च शनिवार रोजी सायंकाळी ५:०० वाजता वरील नमूद ठिकाणी छापा मारला असता ईसम नामे शेख रेहान शेख हारून रा. फुलेनगर माजलगाव हा त्याचेकडे असलेल्या काळ्या रंगाच्या स्कुटीमध्ये कोयत्या मिळुन आला.त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला आणुन त्याच्या विरूध्द गु.र.नं. ११९/ २०२५ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून कोयता व मोटार सायकल असा एकुण ४०,५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड,पोलीस शिपाई संतराम थापडे,पोलीस शिपाई सुनिल गवळी,पोलीस शिपाई शिवगणेश मिरकले,पोलीस शिपाई लखन गंगावणे यांनी केली आहे.

# श्री चक्रधर विद्यालयातील विद्यार्थ्यांचे राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**

**श्री.चक्रधर शिक्षण व समाज प्रबोधन मंडळ, बीड .संचलित श्री.चक्रधर माध्यमिक विद्यालय कॅनल रोड, बीड या विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केलेले आहे.**

शैक्षणिक वर्ष २०२४ २५ मध्ये महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे द्वारा संचलित हिंदी विषय संदर्भात इयत्ता सहावी साठी राष्ट्रभाषा प्राथमिक इयत्ता सातवी साठी राष्ट्रभाषा प्रवेशिका आणि इयत्ता आठवी साठी राष्ट्रभाषा सुबोध अशा परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर परीक्षेत श्री.चक्रधर माध्यमिक विद्यालय,बीड.येथील इयत्ता सहावी,सातवी,आठवी या वर्गातील एकूण १४ विद्यार्थी परीक्षेस बसलेले होते पैकी चार विद्यार्थी विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण झालेले आहेत.प्रथम श्रेणीत एकूण आठ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत द्वितीय श्रेणीत एकूण सात विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

सदरची परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये हिंदी विषयाची गोडी निर्माण व्हावी हिंदी विषयाचे व्याकरण समजून घेण्यासाठी मदत व्हावी त्याचा सराव व्हावा वाचनाची आवड लागावी अभ्यासाची आवड लागावी या हेतूने आयोजित करण्यात आली होती.

विद्यालयातील एकूण १४ विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद देत परीक्षेस सामोरे गेले व सर्व विद्यार्थी उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाले. विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वश्री कु.श्रद्धा खोले इयत्ता आठवी चिरंजीव समर्थ जाधव इयत्ता सातवी यशराज पवार शिवम सावंत यांचा समावेश होतो .तर प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये

◀◀ पान ३ वर

# वैद्यकीय क्षेत्रातील संवेदनशील व्यक्तिमत्त्व डॉ. भाऊसाहेब खेडकर मातृभुमी प्रतिष्ठानकडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी

कोरोना महामारीच्या कठीण काळात ढेकणमोहा व परिसरात वैद्यकीय क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे व निराधारांना विनामुल्य सेवा आणि गोरगरिबांना अल्पदरात सेवा उपलब्ध करून देण्यात अग्रेसर असणारे डॉ भाऊसाहेब खेडकर यांचा मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष सत्कार केला. हा कार्यक्रम बीड तालुक्यातील मौजे ढेकणमोहा येथील खेडकर हॉस्पिटलमध्ये दि. २० मार्च २०२५ रोजी संपन्न झाला.



कोरोना महामारीच्या काळात रुग्ण हेच देवत माणुन रुग्णांची सेवा हेच कर्तव्य मानून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या डॉ भाऊसाहेब खेडकर यांनी अनेक रुग्णांचे प्राण वाचवले. त्यांच्या निःस्वार्थ सेवेचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ.भाऊसाहेब खेडकर यांचा मातृभूमी प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने शाल ,पुष्पहार, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देताना डॉ. खेडकर यांनी सांगितले की, महामारीच्या काळात वैद्यकीय क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य बजावले मी देखील त्याचाच एक छोटासा भाग होतो .हा सन्मान माझ्यासाठी नाहीतर त्या प्रत्येक आरोग्य सेवकासाठी आहे, ज्यांनी जीव धोक्यात घालून रुग्णसेवा केली. त्या माझ्या क्षेत्रातील मान्यवरांना समर्पित करतो असे मत त्यांनी व्यक्त केले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय तांदळे होते. त्यांनी यावेळी बोलताना कोरोना काळातील डॉक्टरांचे योगदान अमूल्य आहे. खेडकर सरांनी ज्या धैर्याने आणि समर्पणाने सेवा दिली, ती आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार काढले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये प्रा डी जी तांदळे, राजकुमार कदम, डॉ संजय तांदळे, डॉ आनंदकुमार लिमकर, डॉ ज्ञानेश्वर जोशी, डॉ अशोक नागरगोजे,लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे , राजेंद्र तिडके, प्रा. बाळासाहेब नागरगोजे, लक्ष्मण चाटे ,पाटोदा येथील रोटी बँक चे संचालक संतोष गर्जे, रंजना हुरकुडे, ज्योतीराम हुरकुडे,विनोद सवासे, सय्यद युसुफ, तसेच खेडकर हॉस्पिटलच्या सहकाऱ्यांचा समावेश होता. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवर मंडळींचे डॉ. भाऊसाहेब खेडकर यांनी विशेष आभार मानले.

# आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते निपाणी जवळका येथे विकासकामांचा शुभारंभ

## पाच वर्षात गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला असून आज निपाणी जवळका येथे ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी उभारणी या विविध विकास कामांचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. आपण मला विधानसभेत काम करण्याची संधी दिली असून त्या बळावरचयेणाऱ्या पाच वर्षात गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचा विश्वास



त्यांनी यावेळी व्यक्त केला.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील निपाणी जवळका येथे आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते विवीध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी या कामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. याप्रसंगी पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरीचे महंत महादेव महाराज श्रावणपुरी,

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# युट्यूब चॅनेल व नव माध्यमांनी खातरजमा न करता बातमी देऊ नये -वळसे पाटील

## आंबेगाव तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकारांची एकदिवसीय कार्यशाळा ;आंबेगाव, खेड, जुन्नर, शिरूर तालुक्यातील पत्रकारांची उपस्थिती

**मंचर । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस युट्यूब चॅनेल व नव माध्यमांची संख्या वाढत चालली आहे. त्यांनी खातरजमा न करता बातमी देऊ नये. असे आवाहन माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी केले.

मंचर (ता.आंबेगाव) येथे जीवन मंगल कार्यालयात रविवारी (दि.२३) आंबेगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या कार्यशाळेत वळसे पाटील बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन दीप प्रज्वलाने वळसे पाटील, सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक निलेश खरे, टी.व्ही.९ मराठी चे संपादक उमेश कुमावत व मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी आमदार पोपटराव गावडे, शरद पाबळे, डी.के. वळसे पाटील, सुनिल लोणकर, संतोष वळसे पाटील, निलेश कान्नव, कुमार होनराव यांच्यासह आंबेगाव खेड जुन्नर व शिरूर तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. यावेळी वळसे पाटील म्हणाले, सत्यता न पडताळता माहिती प्रसारित केल्यास समाजातील वातावरण बीघडते. मी गृहमंत्री असताना मस्जीदीला आग लागल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. मालेगाव व अन्य भागात दंगली झाल्या. पोलीस यंत्रणेने केलेल्या तपासात सदर व्हिडीओ बांग्लादेशातील असल्याचे आढळून आले. त्यामुळे प्रसार माध्यमांनी तसेच प्रत्येकाने आलेल्या कोणत्याही माहितीची किंवा व्हिडीओची सत्यता पडताळणे गरजेचे आहे. पत्रकारांनी कोणत्याही एका विचारला प्राधान्य न देता तटस्थ पत्रकारिता केली तरच पत्रकारितेला भविष्य आहे. अन्यथा पत्रकारितेला अनेक पर्याय उपलब्ध होतील. पत्रकारांनी बदलत्या काळानुसार नव तंत्रज्ञान आत्मसात करावे. अशी अपेक्षा खरे यांनी व्यक्त केली. एस.एम. देशमुख म्हणाले, पत्रकारांची पेन्शन, पत्रकार भवन व पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेण्याची गरज आहे. पत्रकारांनी काम करताना विश्वासार्हता टिकवून काळानुरूप बदलले पाहिजे. ग्रामीण भागातील पत्रकारांनी जोडव्यवसाय करावा, असे कुमावत यांनी सांगितले. या कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून म्हाडा पुणे चे अध्यक्ष आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून संपादक सम्राट फडणीस, प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (कात्रज) अध्यक्ष ड. स्वप्निल ठमढे, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांची उपस्थिती होती. समारोपाच्या कार्यक्रमांमध्ये विष्णू काका हिंगे, सुनील बाणखेले, गोविंद जाधव, रत्नाताई विकास गाडे, रमेश येवले, ताराचंद कराळे आणि प्रदीप देसाई यांचा सन्मान करण्यात आला. पूजा थिगळे यांनी सूत्रसंचालन केले.

पाहुण्यांचे स्वागत आणि कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे संतोष वळसे पाटील, निलेश कान्नव, चंद्रकांत घोडेकर, रवींद्र वाळके, सावता झोडगे, विवेक शिंदे, जयेश शहा, सुदाम बिडकर, विकास गाडे, भरत चिखले, सचिन तोडकर, साईदीप ढोबळे, अरुण गोरडे, विशाल करंडे, रमेश जाधव, लक्ष्मण ढोबळे, कांताराम भवारी, एस व्ही शेटे, अनुष्का कोंड्रा, प्रतापराव हिंगे, अशोक शिंगाडे, मधुकर गायकवाड, सिताराम काळे, अविनाश गुंजाळ, किशोर खुडे, नवनाथ थोरात, संतोष जाधव, अरुण सरोदे, मोसिन काठेवाडी, सत्यजित गाडे, प्रमोद दांगट यांनी परिश्रम घेतले.





### या मान्यवरांचा झाला सन्मान

यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय क्षेत्रात काम केलेले हर्षल मोरडे, प्रदीप देसाई, प्रशांत कडूसकर, उदय ढगे, भरत भोर, संदीप एरंडे, निलेश थोरात, दत्ता गांजाळे, पांडुरंग निघोट, अजय घुले, रत्ना गाडे, संजय थोरात या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

## स्वारगेट अत्याचार प्रकरणात सर्वात मोठी कारवाई, पुण्यातील 'त्या' बड्या अधिकाऱ्यांची बदली




पुणे: पुण्यातील स्वारगेट बस डेपोमध्ये (झीपिश ड्ुरीसशीं ईीं ऊर्शो ऊीळाश) एका २६ वर्षांच्या तरूणीवरती अत्याचार झाल्याची घटना घडली होती, त्या घटनेचे विधिमंडळात देखील पडसाद उमटले आहेत. या घटनेप्रकरणी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर बदलीची कारवाई केली आहे. त्यात राज्य परिवहन महामंडळाचे पुणे प्रदेशाचे व्यवस्थापक व पुणे विभागाचे नियंत्रक यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती.

एसटी प्रशासनाने स्वारगेट अत्याचार प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली होती. घटनेनंतर काही दिवसांतच आगार व्यवस्थापक 'जयेश पाटील, कनिष्ठ आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील व स्थानकप्रमुख मोहिनी ढेरे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. त्यानंतर प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रकसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यावरती देखील बदलीची कारवाई केली आहे. पुण्याच्या प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के यांची बदली नागपूरला करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नागपूरमधील श्रीकांत गभणे यांची नियुक्ती केली आहे.

पुण्याचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांची नाशिकच्या विभाग नियंत्रकपदी नियुक्ती केली; तर नाशिक विभागाचे विभाग नियंत्रक अरुण सिया यांची पुण्याला बदली केली आहे. सिया मंगळवारी पदभार स्वीकारणार आहेत. तसेच, पुणे विभागाचे यंत्र अभियंता पंकज ढावरे यांची अकोल्याला बदली केली. त्यांच्या जागी दापोडी मध्यवर्ती कार्यशाळेतील अधीक्षक स्मिता कुलकर्णी यांची नियुक्ती केली. पुणे विभागाचे वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी गिरीश यादव यांची मुंबईला त्याच पदावर बदली झाली. पुण्याचे सुरक्षा निरीक्षक शंकर लादे यांच्याकडे गिरीश यादव यांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

## पुरंदर विमानतळाला आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईकांचे नाव द्या: शितोळे



सासवड । प्रतिनिधी

सासवड येथील छत्रपती श्रीशिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा (शिवतीर्थ), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, थोर समाजसेवक महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून नगरपरिषद चौकातून शिवतीर्थ चौक ते नवीन प्रशासकीय इमारत, असा मोर्चा जय मल्हार क्रांती संघटनेच्या वतीने काढण्यात आला. त्या वेळी शितोळे बोलत होते.

यासंदर्भातील निवेदन निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील यांना देण्यात आले. राजे उमाजी नाईक यांचे वंशज चंद्रकांत खोमणे, संघटनेचे राज्य अध्यक्ष अंकुश जाधव, सुधीर नाईक, दादासाहेब मदने, किरण खोमणे, नाना मदने, गणेश गावडे, बापू खोमणे, ॲड. विशाल शिरतोडे, महेश जाधव, गणपत शितकल, गंगाराम जाधव, बिट्टू भांडवलकर, अशोक चव्हाण, साहेबराव जाधव, विकास भांडवलकर, अमोल चव्हाण, नीलेश जाधव, खंडू जाधव, नीलेश भांडवलकर, भैया खोमणे, दिलीप चव्हाण उपस्थित होते.

## घरफोडी अन् वाहनचोरी करणारी बारक्या टोळी जेरबंद; गुन्हे शाखा युनिट ६ ची ॲक्शन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात घरफोड्या व वाहन चोरी करणारी 'बारक्या टोळी' ला पकडण्यात पोलिसांना यश आलं आहे. पुणे शहरातील जवळपास सहा वेगवेगळे गुन्हे उघडकीस आले आहेत. पुणे पोलिसांकडून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून सोन्याच्या दागिन्यांसह चार मोटरसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. १० लाख ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने तर दोन लाख ४० हजार रुपयांच्या गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत, पृथ्वीराज उर्फ साहिल संतोष आव्हाड, आनंद लोंढे,आर्यन आगलावे,कुलदीप सोनवणे तसेच एका अल्पवयीन तरुणाला पुणे पोलिसांनी अटक केली आहे.



घरफोडी आणि वाहन चोरी करणाऱ्या बारक्या टोळीला जेरबंद करण्यास गुन्हे शाखा युनिट ६ ला यश आले आहे. या टोळीकडून १० लाख ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि दोन किलो वजनाच्या चांदीच्या विटा तसेच २ लाख ४० हजार किमतीच्या वेगवेगळ्या कंपनीच्या चार मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. बारक्या टोळीतील पृथ्वीराज उर्फ साहिल संतोष आव्हाड वय (१९ वर्ष)आनंद उत्तरेश्वर लोंढे (३४ वर्ष), आयर्न कैलास आगलावे (वय १८) कुलदीप गणपत सोनवणे( वय १९ वर्ष), एक विधी संघर्षित बालक यांना गुन्हे शाखा युनिट सहा कडून जेरबंद करण्यात आला आहे.

अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र मुळीक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट सहा चे प्रभारी पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस हवालदार बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे,नितीन मुंडे,कानिफनाथ कारखेले, सुहास तांबेकर, ऋषिकेश ताकवणे, सचिन पवार, ऋषिकेश व्यवहारे,शेखर काटे, गणेश डोंगरे,समीर पिलाने, नितीन धाडगे,बाळासाहेब तनपुरे, म प व प्रतीक्षा पानसरे कीर्ति मांदले यांनी या टोळीला पकडलं आहे.

## मल्हार सर्टिफिकेशनला जेजुरीकर ग्रामस्थांचा विरोध; लेखी माफी मागावी अन्यथा विश्वस्त मंडळाला गावबंदी: ग्रामस्थ मंडळाचा इशारा

**जेजुरी । प्रतिनिधी**

राज्याचे मत्समंत्री नितेश राणे यांनी मांस विक्री करणाऱ्या दुकानाला मल्हार सर्टिफिकेशन नाव देण्याचा निर्णय घेतला आहे. या नावाला जेजुरीतील ग्रामस्थ मंडळाने विरोध दर्शविला असून, देवसंस्थानच्या पाच विश्वस्तांनी मंत्री नितेश राणे यांची भेट घेवून समर्थन दिले होते. मल्हार सर्टिफिकेशनला विरोध व देवसंस्थानच्या विश्वस्त मंडळाचा निषेध करण्यासाठी ऐतिहासिक छत्री मंदिर परिसरात ग्रामस्थ मंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीत मंत्री नितेश राणे व जेजुरी देवसंस्थानचा ग्रामस्थांकडून निषेध नोंदवण्यात आला. विश्वस्त मंडळाने भाविकांना सोयी सुविधा देण्यात ऐवजी राजकरण करू नये, विश्वस्त मंडळाने मल्हारी मार्तंड, तमाम भाविक व ग्रामस्थांची लेखी माफी मागावी अन्यथा गावबंदी घालण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. येत्या आठ दिवसात माफी न मागितल्यास विश्वस्तांना गाव बंदी करून गावबंदी करण्याचे या बैठकीत एकमताने ठरले. या बैठकीला जेजुरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तडीपार गुंडासह चौघांना बेड्या, ४ पिस्तूल जप्त ; गुन्हे शाखेची कारवाई

पुणे : तडीपार गुंडाचे वास्तव्य शहरातच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले असून, नुकतेच याबाबत नवराष्ट्रने वृत्त दिले होते. त्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून, नंतर पोलिसांनी केलेल्या एका कारवाईत तडीपार असतानाही शहरात वास्तव्य करणार्या सराईत गुन्हेगारांसह चौघांना एकाच वेळी अटक केली आहे. खंडणी विरोधी पथकाने त्यांच्याकडून ४ पिस्तूल व ८ जिवंत काडतूसे असा शस्त्रसाठा जप्त केला आहे.



गोपाळ संजय यादव (वय २४, रा. वाघोली), अमन उर्फ मुन्ना दस्तगीर पटेल (वय २३, रा. वाघोली), इशाप्पा उर्फ विशाल जगन्नाथ पंदी (वय २४, रा. वाघोली), देवानंद शिवाजी चव्हाण (वय २३, रा. शिरूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे उपायुक्त निखील पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक छगन कापसे, उपनिरीक्षक गौरव देव, सुनिल पवार, पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे, दिलीप गोरे यांच्यासह पथकाने केली आहे.पटेल आणि पंदी यांच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आलेली आहे. तर, यादव याच्यावर दरोडा, खूनाचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. चारही आरोपी एकमेकांचे मित्र आहेत. गोपाळ यादव हा वाघोलीतील राजेश्वरी नगरी भागात रहायला आहे. त्यांच्या एका मित्राचे लग्न असल्याने चौघेजण यादव याच्या घरी आले होते. यादरम्यान रेकॉर्डवरील आरोपी हे वाघोली भागात असून, दखलपात्र गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाला मिळाली. त्यानूसार पथकाने सापळा रचून चौघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे चार पिस्तूल व आठ काडतूसे आढळून आली. त्यानूसार पथकाने चौघांना अटक केली आहे.तत्पुर्वी दैनिक नवराष्ट्रकडून तडीपार गुंडांचे शहरातच वास्तव्य असल्याचे वृत्त दिले होते. त्यात गेल्या तीन वर्षातील तडीपार गुंड व पुन्हा शहरात वास्तव्यास आल्यानंतर पकडलेल्या कारवाईचे आकडेच दिले होते. तसेच, तडीपार गुंड पुन्हा शहरात येत गुन्हे कसे करतात, याचेही उदाहरण दिले होते. त्यामुळे पोलिसांची तडीपारीची कारवाई फक्त कागदोपत्रीच असल्याचेही वास्तव दाखविले होते. पोलिसांनी पुन्हा दोन तडीपारांना अटक करून तडीपार गुंडाचे वास्तव पाहायला मिळत आहे.

## रगती पतसंस्थेत २ कोटी ८५ लाखांचा अपहार

आळेफाटा । प्रतिनिधी

बोरी बुद्रुक (ता. जुन्नर) येथील प्रगती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत २०१६ ते २०२२ या कालावधीत २ कोटी ८५ लाख ४६ हजार ८९६ रुपयांची अफरातफर करून फसवणूक केल्याप्रकरणी पतसंस्थेच्या तत्कालीन १२ संचालकांसह दोन व्यवस्थापक अशा १४ जणांवर आळेफाटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी दिली.




माजी संचालक संदीप किसन कोरडे, रमेश हनुमंत जाधव, चंद्रकांत देवराम जाधव, राम वसंत बढे, बन्सी नाथा कोरडे, खंडेराव जानकु कोरडे, संजय दशरथ जाधव, अविनाश मनोहर गुंजाळ, संजय पांडुरंग हलकरे, सुशीला भिकाजी जाधव, अरुणा सुरेश जाधव (सर्व रा.बोरी बुद्रुक, ता. जुन्नर ) व तत्कालीन व्यवस्थापक संतोश ज्ञानदेव साबळे, रितेश सोपान पानसरे (दोघे रा. साकोरी, ता. जुन्नर) यांच्यावर महाराष्ट्र ठेवीदार अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल केला. याप्रकरणी लेखापरीक्षक संतोष बांगर यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बोरी बुद्रुक येथील प्रगती सहकारी पतसंस्थेत २०१६ ते २०२२ या कालावधीत माजी संचालक व व्यवस्थापकांनी ठेवीदारांच्या खात्यामध्ये चुकीच्या नोंदी व चुकीचा जमाखर्च करून गैरव्यवहार करत सहकार कायदा व नियमांचे उल्लंघन केले. तसेच संस्थेची चुकीची आर्थिक पत्रके तयार करून खरी आर्थिक परिस्थिती दडवून चुकीचे वार्षिक अहवाल तयार केले. तसेच नियमबाह्य बोगस कर्ज वितरण करत बँकेच्या ठेवी परस्पर काढल्या.

संस्थेचे सर्व वार्षिक व मासिक इतिवृत्त नोंद वह्या, ठेव व कर्ज खतावणी, सभासद कर्ज प्रकरणे तपासणीसाठी लेखापरीक्षणास सादर केली नाहीत. यानंतर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जुन्नर यांनी संतोष बांगर यांची लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केली. त्यांनी या कालावधीचे लेखापरीक्षण केले असता तत्कालीन संचालक व व्यवस्थापक यांनी या कालावधीत संस्थेच्या सभासद व ठेवीदार यांची फसवणूक करत २ कोटी ८५ लाख ४६ हजार ८९६ रुपयांचा गैरव्यवहार करत फसवणूक केल्याचे आढळून आले.

याबाबतचा अहवाल त्यांनी सहाय्यक निबंधक जुन्नर, जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना सादर केला. तसेच त्यांच्या आदेशानंतर संतोष बांगर यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी पतसंस्थेच्या तत्कालीन १२ संचालकांसह दोन व्यवस्थापक अशा १४ जणांवर गुन्हा दाखल केला. पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल पन्हाळकर पुढील तपास करत आहेत.

## विश्व कल्याणासाठी ९ एप्रिल रोजी विश्व नवकार मंत्र दिवस साजरा होणार

पुणे : विश्वशांतीसाठी आणि जगाच्या कल्याणासाठी येत्या ९ एप्रिल २०२५ रोजी विश्व नवकार मंत्र दिवस साजरा केला जाणार आहे. या दिवशी जगभरातील १०८ देशांत नवकार महामंत्राचा एकाचवेळी जप होणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन जीतो च्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती जीतो पेक्सचे चेअरमन पृथ्वीराज कोठारी व राष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी यांनी दिली.

विजय भंडारी म्हणाले की, ९ एप्रिल हा विश्व नवकार दिवस म्हणून जगभर साजरा होईल आणि त्या दिवशी सकाळी ७ ते ९.३० च्या दरम्यान जगभरात एकाचवेळी नवकार मंत्राचा जप होईल. त्यासाठी धार्मिक गुरु, राजकीय नेते, अभिनेते, खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आदी अनेक क्षेत्रातील मान्यवर त्या त्या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. धर्म, जात, पंथ, राज्य, देश याच्या सीमा ओलांडून जगभरातील १०८ देशात या नवकार महामंत्राचा जप होणार आहे. यासाठी १०० हून अधिक अनुष्ठान असणार आहेत. तर, ६ हजारांहून अधिक ठिकाणांहून या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रसारण होणार आहे.

जगभर अशांती व संघर्ष पाहायला मिळत आहे. अशा संघर्षाच्या काळात संपूर्ण विश्वात शांतता निर्माण व्हावी आणि विश्वाचे कल्याण व्हावे. जगाची नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे वाटचाल व्हावी आणि आपण सर्व मनुष्य शांती, सत्य व अहिंसेच्या मार्गावर चालावे यासाठी नवकार महामंत्राचा हा जप होणार आहे. पुरातन काळापासून यासाठी नवकार महामंत्राचा जप केला जातो.

नवकार महामंत्र ही शाश्वत प्रार्थना आहे. ही प्रार्थना विनम्रता, कृतज्ञता आणि भक्तीचे प्रतिक आहे. मानवतेसाठी हा मंत्र सर्वाधिक उपयुक्त असून यातून विश्वकल्याणाचा भाव प्रकट होतो. येत्या ९ एप्रिल रोजी साजरा होणाऱ्या विश्व नवकार मंत्र दिवसानिमित्त जगभरात १०८ देशांत नवकार महामंत्राचा जप होणार आहे. विश्व कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या या प्रार्थनेसाठी आपण सर्व जाती-धर्मातील लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जीतो पेक्सचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी यांनी केले आहे. विश्व कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या नवकार महामंत्राला विशेष महत्त्व आहे. या प्रार्थनेद्वारे अरिहंतों ना नमन केले जाते. या त्या विभूती आहेत ज्यांनी केवलज्ञान प्राप्त केले आहे. मोक्ष प्राप्त झालेल्या विभूती, साधू संत, गुरु, शिक्षक या महात्मांना याद्वारे नमन केले जाते. या नवकार महामंत्राच्या प्रार्थनेमुळे आपल्यामध्ये व आपल्या आजुबाजूला विश्वामध्ये सकारात्मकता वाढते, असे चेअरमन पृथ्वीराज कोठारी यांनी सांगितले.